अग्निवीरांना दोन वर्षांची मुदतवाढ

नवी दिल्ली : अग्निवीरांना त्यांच्या सेवा कालावधीत दोन वर्षांची मुदतवाढ देण्याची घोषणा चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल एन.एस. राजा सुब्रमणी यांनी केली आहे. या निर्णयानुसार, चार वर्षांचा प्रारंभिक सेवा काळ पूर्ण झाल्यानंतर नियमित सेवेसाठी निवड न झालेल्या ७५ टक्के अग्निवीरांना आणखी दोन वर्षे सैन्यात सेवा बजावता येणार आहे. सरकारच्या या निर्णयामुळे अग्निवीरांचा एकूण सेवा कार्यकाळ आता सहा वर्षांचा होणार असून, त्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन आणि निवड निकषांच्या आधारे त्यांना पुन्हा एकदा नियमित सशस्त्र दलात सामील होण्याची संधी मिळणार आहे.

१९३७-२०२६ ९० वर्ष

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

साई इन रिसॉर्ट चोंढी
अलिबाग येथे रुमबॉय व गार्डनसाठी व्यक्ती पुरुष/स्त्री पाहिजेत. (अपंग व्यक्ती चालेल) अर्जासह भेटा.

रायगड | गुरुवार | दि. ५ नोव्हेंबर २०२६ | अंक १५० | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹ | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

पटेल ज्वेलर्स®

शुभ धनतेरस

त्रिअलंकार महोत्सव

फ्री गोल्ड कॉइन*

घडणावळीवर ३०% सूट

१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर

महाराष्ट्र: पनवेल, पेण, उरण । गुजरात: महेसाणा, मोडासा, लुणावाडा

TELL NO: 022 3104 0000 | ALL DAYS OPEN

निवडक



शिघ्रे-गारंबीलगत बांधला वनराई बंधारा

मुरूड : पावसाचे वाहून जाणारे पाणी बंधाऱ्याच्या साह्याने अडवून ठेवले तर भूगर्भातील पाणीसाठा वाढून आजू बाजूला असणारे विहिरी तलाव यामध्ये पाणी साठा वृद्धिंगत होण्यास मदत होणार आहे. यासाठी नद्यांमधून वाहून जाणारे पाणी समुद्राला मिळण्यापेक्षा ते अडवून ठेवल्यास पाणी मुरून त्या भागातील आजू बाजूच्या भागास मुबलक पाणी मिळते. यासाठी दुष्काळ परस्थितीवर मात करण्यासाठी सर्वत्र वनराई बंधारे बांधण्याचे काम जोरात सुरू आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुरुड वन विभागाचा जलसंधारणाचा पुढाकार घेऊन बांधण्यात आला आहे.वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा वनराई बंधारा बांधण्यात आला आहे.मौजे शिघ्रे गारंबी मध्ये श्रमदानातून वनराई बंधारा बांधण्यासाठी वनपाल शशीकांत पाटील, वनरक्षक शशिकांत चेवले, वनरक्षक सागर तडवी व वनमजूर दिनेश रोटकर आणि ग्रामस्थ केतन पाटील, गणेश नाक्ती, मयुरेश घरत, गणेश पवार शालेय विद्यार्थी सौरभ गायकर, स्वराज गायकर, सर्वेश ठाकूर, आवेश ठाकूर, संभव ठाकूर, कार्तिक गायकर, कुणाल झिंगले आदींनी विशेष परिश्रम घेतले आहेत.



गरजू कुटुंबांना साहित्याचे वाटप

मुरूड : जिंदल विद्या मंदिर, साळाव यांच्या वतीने राबविण्यात आलेला आनंदाचा उजेड हा उपक्रम संपन्न झाला. या उपक्रमांतर्गत आदिवासी वाडी सुंब्रादेवी गावात दिवाळीनिमित्त जमा करण्यात आलेल्या वस्तूंचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून कुटुंबांच्या दिवाळीत आनंदाचे रंग भरून माणुसकीचा दीप उजळविण्यात आला. डोंगराळ भागात वसलेल्या आणि प्रामुख्याने आदिवासी समाजाची लोकवस्ती असलेल्या सुंब्रादेवी गावातील गरजू कुटुंबांसोबत दिवाळीचा आनंद वाटून घेणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. दिवाळी हा केवळ स्वतःच्या घरात आनंद साजरा करण्याचा सण नसून इतरांच्या आयुष्यातही आनंदाचा प्रकाश पसरविण्याची संधी आहे, हा विचार शाळेने प्रत्यक्ष कृतीतून जपला. या उपक्रमाला पालक, विद्यार्थी आणि शाळेतील सहकाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यांच्या सहकार्यातून तांदूळ, डाळ, तेल, साखर, बिस्किटे, दिवाळीचा फराळ, लाडू, चकली यांसारखे खाद्यपदार्थ, तसेच पणत्या, दिवे, आकाशकंदील, माळेचे दिवे आणि इतर दिवाळी सजावटीच्या वस्तू जमा करण्यात आल्या. या सर्व वस्तूंचे सुंब्रादेवी येथील गरजू कुटुंबांना प्रत्यक्ष वाटप करण्यात आले.



श्रमदानातून उभारला वनराई बंधारा

खोपोली : राज्यात यंदा पावसाचे प्रमाण कमी होत असल्याने संभाव्य दुष्काळाची चाहूल लागली आहे. भविष्यातील पाणीटंचाईचे संकट ओळखून पावसाचा प्रत्येक थेंब अडविण्यासाठी शिरवली ग्रामपंचायतीने जलसंवर्धनाची मोहीम हाती घेतली आहे. याच अनुषंगाने ग्रुप ग्रामपंचायत शिरवली आणि वनपरिक्षेत्र कार्यालय खालापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ढेबे बर्गेवाडी येथील ग्रामस्थांच्या लोकसहभागातून वनराई बंधाऱ्याची उभारणी करण्यात आली. वाहून जाणारे पाणी अडवून जमिनीत मुरविणे, भूजल पातळी वाढविणे आणि भविष्यातील पाणीटंचाईवर मात करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. शिरवलीचे सरपंच महेश पाटील यांच्या पुढाकारातून ग्रामस्थांनी श्रमदान करून या जलसंवर्धनाच्या कामात सहभाग नोंदविला.अनियमित पाऊस आणि संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी अडविणे व त्याचे योग्य नियोजन करणे ही काळाची गरज असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे. थेंब थेंब पाणी अडवू या, गावाच्या भविष्याची जलसुरक्षा जपू या! हा संदेश देत शिरवली ग्रामपंचायतीने लोकसहभागातून जलसंवर्धनाचा आदर्श उपक्रम राबविला आहे. श्रमदानातून जलसंवर्धन आणि लोकसहभागातून जलक्रांती या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देणारा हा उपक्रम इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.

महाड तालुक्यात जलसंधारणाला गती

■ सात बंधाऱ्यांमुळे पाणीसाठ्यात वाढीची अपेक्षा; पाणीटंचाईवर मात करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यात संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जलसंधारणाच्या कामांना गती देण्यात आली असून, गांधारी आणि काळ नदीवर एकूण सात बंधाऱ्यांची उभारणी करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या बंधारे योजनेला महाड तालुक्यात चालना मिळत आहे. तालुक्याचे उपसभापती सुरेश महाडिक यांनी या कामांसाठी पुढाकार घेतल्याने नदीपात्रातील पाणी अडविण्यास आणि उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन करण्यास मदत होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते स्थानिक पातळीवर अडवून त्याचा उपयोग शेती, पशुधन आणि नागरिकांच्या पाण्याच्या गरजांसाठी व्हावा, या उद्देशाने बंधारे उभारणीच्या कामांना प्राधान्य देण्यात आले आहे.

महाड तालुक्यातील जलसंधारणाच्या या मोहिमेअंतर्गत गांधारी नदीवर पाच, तर काळ नदीवर दोन बंधाऱ्यांची उभारणी करण्यात आली आहे. या सात बंधाऱ्यांमुळे नदीपात्रात पाणी अडवून ठेवण्यास मदत होत आहे. परिणामी, परिसरातील पाण्याची उपलब्धता वाढण्याबरोबरच भविष्यात भूजल पातळी टिकवून ठेवण्यासही या उपक्रमाचा फायदा होऊ शकतो.

नदीपात्रात पाणी साठल्यामुळे आसपासच्या विहिरींना आणि शेतीला अप्रत्यक्ष लाभ मिळण्याची शक्यता आहे. विशेषतः उन्हाळ्यात पाण्याची गरज वाढत असताना अशा जलसंधारणाच्या उपाययोजना महत्त्वपूर्ण ठरू शकतात. मात्र, त्याचा प्रत्यक्ष परिणाम पर्जन्यमान, भूगर्भातील पाण्याची स्थिती आणि स्थानिक भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून राहणार आहे. दुष्काळ किंवा पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा संभाव्य संकटाचा अंदाज घेऊन आधीच जलसंधारणाची कामे करणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी अडविणे, भूजल पुनर्भरणाला चालना देणे आणि स्थानिक जलस्रोतांचे संवर्धन करणे या उपाययोजनांमुळे ग्रामीण भागातील पाणीप्रश्न सोडविण्यास दीर्घकालीन मदत होऊ शकते.

पालकमंत्री भरत गोगावले यांच्या संकल्पनेतील बंधारे योजनेला उपसभापती सुरेश महाडिक यांनी प्रत्यक्ष कामातून दिलेली चालना महाड तालुक्यातील जलसंधारणाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. या कामांमुळे पाणीसाठा वाढविण्याच्या प्रयत्नांना बळ मिळाले असून, आगामी उन्हाळ्यात त्याचा कितपत फायदा होतो, याकडे स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार बंधारे उभारणी आणि जलसंधारणाची कामे राबविल्यास पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यास मदत होऊ शकते. त्यासाठी बंधाऱ्यांची नियमित देखभाल, पाणीसाठ्याचे नियोजन आणि पाण्याचा काटकसरीने वापर यांनाही तितकेच महत्त्व द्यावे लागणार आहे.

महाड तालुक्यात गांधारी आणि काळ नदीवरील सात बंधाऱ्यांच्या माध्यमातून जलसंधारणाला चालना मिळाली आहे. आता या उपक्रमाचा प्रत्यक्ष लाभ शेती, विहिरी आणि स्थानिक नागरिकांना कितपत मिळतो, हे आगामी उन्हाळ्यात स्पष्ट होणार आहे. जलस्रोतांचे संवर्धन आणि भविष्यातील पाणीटंचाई रोखण्यासाठी अशा उपाययोजनांची सातत्याने अंमलबजावणी करणे ही काळाची गरज बनली आहे.

मार्चअखेर शंभर टक्के कृषीपंपांना दिवसा वीजपुरवठा

। रायगड । प्रतिनिधी ।

● महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांची माहिती

शेतकऱ्यांना कृषिपंपासाठी दिवसा वीजपुरवठा करण्याच्या हेतूने सुरू केलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या बळावर राज्यात आता ८० टक्के कृषिपंपांना दिवसा वीज पुरवठा होत आहे. आगामी मार्च अखेर १०० टक्के कृषिपंपांना सौरऊर्जेद्वारे दिवसा वीजपुरवठा करण्यात येईल, असे प्रतिपादन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले.

नवी दिल्ली येथे भारत रिन्यूबल एनर्जी समिट अँड एक्सपो २०२६ या केंद्र सरकारच्या नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेतील



चर्चासत्रात श्री. लोकेश चंद्र बोलत होते. डिस्ट्रीब्यूटेड एनर्जी फॉर एनर्जी सिक्युरिटी, सेल्फ रिलायन्स अँड विकसित भारत २०४७ या चर्चासत्रात त्यांनी महाराष्ट्राने विकेंद्रीत स्वरूपात सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभे करून कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी कशी कामगिरी केली आहे, हे स्पष्ट केले. या चर्चासत्रात पंतप्रधानांचे सल्लागार तरुण कपूर यांचे मुख्य भाषण झाले.

इंटरनॅशनल सोलर अलायन्स असेंब्लीच्या नवव्या सत्रात आयोजित मपंप्स टू प्रोग्रॅम्स: स्केलिंग सोलरायझेशन ऑफ ॲग्रीकल्चर इन द ग्लोबल साउथफ या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात लोकेश चंद्र यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आणि मागेल त्याला सौर कृषी पंप योजना यांची यशोगाथा आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींसमोर मांडली. सोलर अलायन्सचे महासंचालक आशिष खन्ना यांनी यावेळी लोकेश चंद्र यांच्याशी संवाद साधला.

लोकेश चंद्र यांनी सांगितले की, महाराष्ट्रात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना ही पीएम कुसुम या केंद्राच्या योजनेच्या आधारे सुरू करण्यात आली असून या योजनेत १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प विकेंद्रीत स्वरूपात उभारण्यात येत आहेत. आतापर्यंत सुमारे ७ हजार मेगावॉटचे प्रकल्प पूर्ण झाले आहेत. त्यातून उपलब्ध होणारी वीज आणि अन्य तांत्रिक उपायांच्या आधारे आता ८० टक्के कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा सुरु आहे. शंभर टक्के कृषी पंपांना दिवसा सौरऊर्जेचा पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, ते मार्चअखेर पूर्ण होईल.

माणगावात दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव नगरीत मार्गदर्शक मनीषा राजपूत व मन योग मंदिर यांच्यावतीने शुक्रवारी (दि.६) सकाळी ६ ते ८ यावेळेत कालवा परिसर, क्रांतीनगर माणगाव याठिकाणी आरोग्य, आनंद, भक्ती, सकारात्मकता यावर आधारित मन योग मंदिराची सुरेल मैफिल दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या दिवाळी पहाट कार्यक्रम चा माणगावकरांनी मनमुराद आनंद घ्यावा असे आवाहन मनीषा राजपूत व आयोजक मन योग मंदिर यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

धनत्रयोदशीच्या या दिवाळी पहाट कार्यक्रमादिवशी सकाळी ६ ते ६.१५ यावेळेत मंगलमय स्वागत,सकाळी ६.१५ ते ६.२५ यावेळेत दीपप्रज्वलन व प्रार्थना, सकाळी ६.२५ ते ६.५५ दिवाळी पहाट सुरेल मैफिल, सकाळी ६.५५ ते ७.१० यावेळेत शांत ध्यान व सकारात्मक संकल्प, सकाळी ७.१० ते ७.३० आनंदाचे क्षण, सकाळी ७.३० ते ८ यावेळेत स्नेहमेळावा व हेल्दी फराळ असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती मन योग मंदिर माणगाव यांच्यातर्फे देण्यात आली आहे.

पवन खाडेकर याचा वलप येथे सत्कार



। पनवेल । प्रतिनिधी ।

पुण्यातील शास्त्रज्ञांच्या टीमने महाकाय रेडिओ दीर्घिकेचा शोध लावल्याबद्दल या टीममधील एक शास्त्रज्ञ पवन खाडेकर हे वलप गावचे सुपुत्र असल्याचा गर्व आहे, असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे नेते काशिनाथ पाटील यांनी केले.

वलप येथे रहिवासी आणि पनवेल तालुक्यातील रहिवाशांच्या वतीने पवन विजय खाडेकर याच्या भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. या टीममध्ये असणाऱ्या पवन खाडेकर, रमन्ना अत्रेय, धर्मवीर लाल या तिघांनी मिळून या भव्य अशा दीर्घिकेचा शोध लावला.

मारहाण करून कारचे नुकसान

पनवेल : कार डिव्हायडरला धडकल्याने कारचालकाला जाब विचारून मारहाण करून कारचे नुकसान केल्याप्रकरणी विक्रांत विलास देशमुख, ऋषी चाचरे आणि अजिंक्य यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. दिनेश नेमाने हे माणगाव, बुद्रुक येथे राहत असून ते कार घेऊन जात होते. यावेळी कळंबोली रोडवर बी के धाब्याजवळ, कामोठे येथे त्यांच्या कारचा पुढचा डावा साईडचा टायर फुटला आणि कार डिव्हायडरला धडकली. यावेळी आरोपी यांनी कारचालकाला जाब विचारला आणि त्याला बांबूने मारहाण करून जखमी केले.

विजेची मागणी ३३ हजार मेगावॅटवर

। चिरनेर । प्रतिनिधी ।

■ दिवाळीत ३५ हजार मेगावॅटपर्यंत जाण्याची शक्यता

■ विजेच्या वाढत्या मागणीने पुरवठा यंत्रणेवर ताण

राज्यात विजेची मागणी तब्बल ३३ हजार मेगावॉटवर पोहोचल्याने वीजपुरवठा यंत्रणेवर ताण वाढला आहे.दुष्काळीपरिस्थितीमुळेपाणी, कोळसा आणि नैसर्गिक वायूची उपलब्धता कमी होत असतानाच वाढत्या तापमानामुळे घरगुती आणि औद्योगिक क्षेत्रातील विजेचा वापर वाढला आहे. दिवाळीत विजेची मागणी ३५ हजार मेगावॉटपर्यंत जाण्याची शक्यता असून, दिवसा सौरऊर्जेतून मिळणाऱ्या सुमारे आठ हजार मेगावॉट विजेमुळे वीज कंपन्यांना काहीसा दिलासा मिळत आहे.

राज्यात तापमानाचा पारा वाढल्याने घरगुती तसेच औद्योगिक क्षेत्रात वातानुकूलित यंत्रांचा वापर वाढला आहे. परिणामी विजेची मागणी सातत्याने वाढत आहे. दिवसा सौर प्रकल्पांतून सुमारे आठ हजार मेगावॉट वीज उपलब्ध होत असल्याने मागणीचा काही भार कमी होतो. मात्र, सूर्यास्तानंतर सौरवीज उपलब्ध होत नसल्याने वाढती गरज भागविण्यासाठी खासगी कंपन्यांकडून दररोज १० ते ११ हजार मेगावॉट वीज खरेदी करावी लागत आहे, अशी माहिती महावितरणचे मुख्य जनसंपर्क अधिकारी आणि महाजेनकोचे जनसंपर्क अधिकारी संतोष पुरोहित यांनी दिली.

दरम्यान, उरण येथील ६७२ मेगावॉट क्षमतेच्या वायू विद्युत केंद्रालाही नैसर्गिक वायूच्या अपुऱ्या पुरवठ्याचा फटका बसत आहे. केंद्राला आवश्यकतेच्या निम्माच गॅस मिळत असल्याने सहापैकी केवळ चार युनिट सुरू आहेत. त्यातून अवघी २८० ते ३०० मेगावॉट वीजनिर्मिती होत असल्याची माहिती कार्यकारी अभियंता सुनील वाघ यांनी दिली.

पुगांव ग्रामस्थांना मिळणार शुद्ध पाणी

। कोलाड । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील पुगांव गावातील नागरिकांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने प्रमोद म्हसकर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पेण विधानसभा कार्याध्यक्ष प्रमोद म्हसकर आणि रोटरी क्लब रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने गावात जलशुद्धीकरण यंत्र बसविण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे.



या उपक्रमांतर्गत पुगांव ग्रामपंचायत परिसरात मध्यवर्ती ठिकाणी असलेली जागा जलशुद्धीकरण यंत्र बसविण्याच्या प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आली आहे. निवड करण्यात आलेली जागा गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने पुगांव गावातील दोन्ही भागांतील ग्रामस्थांना शुद्ध पाणी घेऊन जाणे सोयीचे होणार आहे. याबाबत उपस्थित ग्रामस्थांमध्ये चर्चा करण्यात आली. सर्वांनी या जागेच्या निवडीस सहमती दर्शविली.



अकबर परदेशी माणगाव भूषण पुरस्काराने सन्मानित

। माणगाव । प्रतिनिधी ।

अकबर परदेशी यांना सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व लोकनेते अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठान माणगाव यांच्यातर्फे माणगाव भूषण पुरस्काराने गौरविण्यात आल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व लोकनेते अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठान माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दीपसंध्या जागर लोककलेचा या कार्यक्रमाचे औचित्य साधून उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी पुन्हा सही रे सही फेमचे सुप्रसिद्ध जेष्ठ अभिनेते जयराज नायर, लोकनेते अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठान माणगावचे संस्थापक ॲड. राजीव साबळे. महाराष्ट्र हास्य जत्रा फेम सुप्रसिद्ध अभिनेत्री रसिका वेंगुरलेकर, मिमिक्री आर्टिस्ट व बहारदार सूत्रसंचालक राष्ट्रीय पुरस्कार विजेते योगेश सुपेकर, माणगाव नगरीच्या नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्ष रिया उभारे, जेष्ठ विधिज्ञ ॲड. विनोद घायाळ, लोकनेते अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठान माणगावचे अध्यक्ष नितीन बामगुडे, डॉ. अजय मोरे, अंकिता मोरे, सूत्रसंचालिका पनवेलच्या स्वाती गवळी व दीपसंध्या कार्यक्रम ातील महिला कलाकार तसेच रसिक प्रेक्षक यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात अकबर परदेशी यांच्या सामाजिक उपक्रमांबद्दल माहिती वाचन करण्यात आली. त्यांच्या या कामगिरीचा आढावा व्यासपीठावरील उपस्थित मान्यवर आणि पुरस्कार कार्यक्रमासाठी उपस्थित असणाऱ्यांसमोर

कालवे दुरुस्तीच्या कामाला वेग | डिसेंबरमध्ये पाणी सोडण्याचा निर्णय

कर्जत हिरवागार करण्याच्या हालचालींना वेग

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पूर्व भाग हिरवागार करणाऱ्या राजनाला कालव्याच्या दुरुस्तीच्या काम ाला वेग आला आहे. सर्व कालवे आणि पोट कालवे यांची साफसफाई करण्याचे काम वेगाने सुरू असून यावर्षी डिसेंबर महिन्याचे पहिल्या आठवड्यात कालव्याचे पाणी सोडण्याची कार्यवाही पाटबंधारे खात्याने सुरू केली आहे.

राजनाला सिंचन समूह टाटाचे भिवपूरी जलविद्युत केंद्राचे अवजलावर कार्यान्वित



आहे.राजनाला डावा कालव्याचे सिंचन सन १९५९ पासुन सुरु आहे. राजनाला उजवा कालवा आणि पालीपोटल कालवा सन १९७२-७३ साली पूर्ण झालेला असून सिंचनास सन १९७३-७४ मध्ये सुरुवात झालेली आहे. राजनाला सिंचन समूहामधून राजानाला डावा कालवा मधील पाणी २१ गावे वापरत असतात. तर राजनाला उजवा कालवा सात गावे तर पाली पोटल कालवा असे एकूण २५४२ हेक्टर जमीन ओलिताखाली येत आहे.

जलविद्युत केंद्रातुन उपलब्ध अवजलापैकी ४२.३३० द.ल.घ.मी. अवजल राजनाला सिंचन समूह मंजुर असुन सदर अवजल बंधाऱ्याद्वारे सोडले जाते. ते पाणी पुढे राजनाला डावा कालवा, राजनाला उजवा कालवा आणि पालीपोटल कालव्यात वळविले जाते. हे पाणी कर्जत तालुक्यातील ४० गावामध्ये दुबार शेती करण्यासाठी महत्त्वाचे ठरत असते. यावर्षी कर्जत तालुका दुष्काळ ग्रस्त म्हणून शासनाने जाहीर केला आहे.परिणामी यावर्षी उन्हाळ्यातील भाताची शेती चांगल्या पद्धतीने करता यावी म्हणून राजनाला कालवा परिसरात शेती साठी लवकर पाणी सोडण्याच्या हालचाली पाटबंधारे विभागाने सुरू केल्या आहेत. त्या दृष्टीने मशिनरी वापरून नालेसफाई सुरू करण्यात आली असून पाटबंधारे विभाग यांच्याकडून कालव्यांची तसेच पोट कालव्यांची आणि नाल्यांची स्वच्छता केली जात आहे.

उर्वरीत सर्व अवजल हे उल्हास नदीत सोडले जात असून हे पाणी नळपाणी योजना यांच्यासाठी पिण्याची पाण्याची तहान भागवण्याचे काम करते.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, ठाणे, मिरा-भाईंदर,भिवंडी- निजामपूर या महानगर तसेच अंबरनाथ आणि बदलापूर या नगरपालिका पिण्यासाठी तसेच औद्योगिक कारणासाठी वापर करतात. राजनाला सिंचन समुहाची प्रकल्पिय सिंचन क्षमता २५४२ हे असुन निर्मित सिंचन क्षमता २३६२ हेक्टर एवढी आहे.

१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | गुरुवार | दि. ५ नोव्हेंबर २०२६ | अंक १५० | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

अलिबाग कॉरिडॉरचा मोबदला वाढणार?

मुंबई : विरार-अलिबाग कॉरिडॉर आणि खावडा प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या न्याय्य मोबदल्यासाठी नुकतीच महत्तपूर्ण बैठक पार पडली. यावेळी खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात त्यांनी तिसऱ्यांदा हा विषय मांडला. या बैठकीत बाधित शेतकऱ्यांना भूसंपादनासाठी 'फॅक्टर २'नुसार जास्तीत जास्त मोबदला देण्याची ठाम मागणी करण्यात आली. या मागणीची सकारात्मक दखल घेत महसूलमंत्र्यांनी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना शेतजमिनींचा फेरप्रस्ताव तयार करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार आणि बाधित शेतकऱ्यांना वाढीव मोबदला मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दोन अपत्यांचा नियम कालबाह्य

मुंबई : भारतात दोनपेक्षा जास्त अपत्ये असलेल्या व्यक्तींना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक लढवता येत नाही. या अपात्र ठरवणाऱ्या नियमांबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाची टिप्पणी केली आहे. महाराष्ट्रातल्या मंगला भीमराव इंगळे यांना तिसरे अपत्य झाल्याने त्यांनस सरपंच पदासाठी अपात्र ठरवले होते. यावर सुनावणीवेळी सुप्रीम कोर्टाने जन्मदर कमी होत असल्याचा उल्लेख केला. देशातील जन्मदर सातत्याने कमी होत असल्याने लोकसंख्या नियंत्रणासाठी तयार केलेल्या अशा नियमांची उपयुक्तता आता संपल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. या नियमांचा पुन्हा विचार करण्याची गरज असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

वेधक

परहूरपाडा येथील फार्महाऊस लुटले

रायगड : अलिबाग तालुक्यातील परहूरपाडा येथील बांबूज ग्रूप फार्महाऊस चोरट्यांनी लुटल्याची घटना घडली. या गुन्ह्याता २ लाख ८० हजार रुपयांचा सोन्याचा ऐवज लंपास केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे परिसरात मालमत्ता सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग तालुक्यातील परहूरपाडा येथील बांबूज ग्रूप नावाच्या फार्महाऊसमध्ये दि.२५ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या सात दिवसांच्या कालावधीत रात्री साडेआठ ते सकाळी साडेअकरा या वेळेत चोरट्यांनी चोरी केल्याची घटना समोर आली आहे. त्यांनी घरातील सोफा कम बेडच्या पेटीमध्ये ठेवलेल्या सोन्याच्या दागीन्यांपैकि २ लाख रुपयांचा सोन्याचा हार, २० हजार रुपयांची •➤पान ५ वर

अल्पवयीन बहिर्णींचे अपहरण

महाड : महाड शहरातील चवदार तळे परिसरात राहणाऱ्या दोन सख्ख्या अल्पवयीन बहिणी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी त्यांच्या वडिलांनी दि.३ नोव्हेंबर रोजी महाड शहर पोलीस ठाण्यात त्यांना कोणतरी पळवून नेल्याची तक्रार दाखल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि.२ नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास दोन सख्ख्या अल्पवयीन मुलींना त्यांच्या घरातून कोणीतरी फसवून नेले. या मुलींपैकी एकीचे वय १६ वर्षे असून, दुसरी मुलगीही अल्पवयीन आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महाड शहर पोलीस करीत आहेत. तसेच, नागरिकांकडे काही माहिती असल्यास त्यांनी पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गाडीच्या धडकेत महिलेचा मृत्यू

नवीन पनवेल : करंजाडे येथील निलेश भाग्यवंत आणि त्यांची पत्नी सोनम भाग्यवंत हे स्कुटीवरून कळंबोली येथून करंजाडे येथे जात होते. यावेळी रात्री सव्वादोन वाजताच्या सुमारास ते करंजाडे येथील चिंचपाडा पुलाजवळ आल्यावर त्यांच्या मागून येणाऱ्या भरधाव गाडीने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात निलेश भाग्यवंत हे गंभीर जखमी झाले. तर, त्यांची पत्नी सोनम भाग्यवंत (३३) यांचा जागीच मृत्यू झाला. यावेळी दोघांनाही मदत न करता अपघात करणार वाहनचालक पळून गेला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

भाजपकडून गोकुळमध्ये

लोकशाहीची गळचेपी

। कोल्हापूर । प्रतिनिधी ।

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात 'गोकुळ'मधील सत्तासंघर्षावरून राजकीय वातावरण तापले आहे. गोकुळमधील पराभव भाजपला पचला नसून शासनाने गोकुळवर चार शासननियुक्त सदस्यांची नेमणूक केली आहे. आता या सदस्यांनाही मतदानाचा अधिकार देण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगत शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी गोकुळच्या कारभारात लोकशाही प्रक्रियेवर गदा आणली जात असल्याची टीका त्यांनी केली.

गोकुळमधील या घडामोडींवर भाष्य करताना जयंत पाटील यांनी, भाजपच्या भूमिकेवर जोरदार निशाणा साधला. गोकुळमधील पराभव भाजपला अद्याप पचवता आलेला नाही. त्यामुळे शासनाच्या माध्यमातून चार सदस्यांची नियुक्ती करण्यात आली



चार शासननियुक्त सदस्यांच्या मतदानाच्या अधिकारावरून जयंत पाटील यांचा भाजपवर घणाघात

सभासदांना रणशिंग फुंकण्याचे आवाहन

आणि आता त्यांना मतदानचा अधिकार देण्याचाही प्रयत्न केला जाईल, अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली. अशा प्रकारे गोकुळच्या कुरुक्षेत्रावर लोकशाहीचे जाहीर वस्त्रहरण सुरू असल्याचे त्यांनी म्हटले. विशेष म्हणजे, दोन दिवसांपूर्वीच भाजपने 'लोकतंत्र बचाव' रॅली काढली होती. मात्र, दुसरीकडे सहकारी संस्थेतील लोकशाही प्रक्रियेबाबत घेतल्या जाणाऱ्या भूमिकेवरून भाजपच्या दुटप्पीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे जयंत पाटील यांनी म्हटले. भाजपचे दिसणारे दात आणि प्रत्यक्ष कृती यामध्ये मोठी तफावत असल्याची टीका करत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. गोकुळ हा केवळ दूध उत्पादकांचा संघ नसून हजारो सभासद आणि दूध उत्पादकांच्या हिताशी जोडलेली महत्त्वाची सहकारी संस्था आहे. त्यामुळे संस्थेच्या कारभारात सभासदांच्या लोकशाही अधिकारांचे संरक्षण होणे आवश्यक आहे. अशावेळी शासननियुक्त सदस्यांच्या मतदानाच्या अधिकाराचा मुद्दा उपस्थित होत असेल, तर सभासदांनी केवळ बघ्याची भूमिका घेऊन चालणार नाही, असे आवाहनही त्यांनी केले.

गोकुळचे अस्तित्व, सभासदांचे अधिकार आणि सहकारातील लोकशाही मूल्ये टिकवण्यासाठी सभासदांनी एकत्र येऊन संघर्षाची तयारी ठेवावी. गोकुळ आणि लोकशाही वाचवण्यासाठी आता रणशिंग फुंकण्याची वेळ आली असल्याचा इशाराही जयंत पाटील यांनी दिला.

लोकशाहीचा आवाज बुलंद करा : आ. सतेज पाटील

गोकुळमधील सत्तासंघर्षात लोकशाही मूल्यांची पायमल्ली होत असल्याचा आरोप करत काँग्रेस नेते आ. सतेज पाटील यांनी पत्रकारांना निर्भीडपणे भूमिका मांडण्याचे आवाहन केले. शासनाच्या निर्णयांमागील वस्तुस्थिती जनतेसमोर आणून सभासदांच्या अधिकारांचा प्रश्न प्रभावीपणे मांडावा. लोकशाहीच्या रक्षणासाठी माध्यमांनी सजग आणि सक्रिय राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.



शाहीर बादल यांचे पाण्यात आंदोलन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जतच्या पाली सायडोंगर परिसरातील टोरेंट प्रकल्पाच्या वृक्षतोडीविरोधात पर्यावरणप्रेमी एकवटले आहेत. यादरम्यान, सायडोंगर जंगल वाचवण्यासाठी मुंबईतील शाहीर बादल यांनी पेज नदीपात्रात उतरून जलआंदोलन सुरू केले. दि.२९ ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या या आंदोलनाला सात दिवस झाले आहेत.

मुंबईतील भांडुप येथील रहिवासी असलेले शाहीर बादल गुडेकर हे अनेक आंदोलनात सहभागी असतात. ते दि.२७ ऑक्टोबर पासून कर्जत येथे आहेत. येथील जंगलतोड रोखण्यासाठी त्यांनी ''जल वाचवा, जंगल वाचवा, जीवन वाचवा'' अभियान अंतर्गत सह्यांची मोहीम हाती घेतली. मात्र, येथील जंगलतोड थांबत नसल्याने आणि टोरंट प्रकल्प रद्द होत नसल्याने शाहीर बादल यांनी पेज नदीच्या पाण्यात उतरून आंदोलन करण्याचा निर्णय घेतला असून, ते दि.२९ ऑक्टोबरपासून पेज नदीच्या पाण्यात उभे आंदोलन सुरू केले. या आंदोलनादरम्यान तेथे येणारे पर्यावरण प्रेमी यांच्यासमोर डफ वाजवत गाणी गाऊन पाली सायडोंगर येथील जंगल वाचवण्याविषयी जनजागृती करत आहेत. दरम्यान, सतत पाण्यात राहिल्यामुळे त्यांच्या पायांची अवस्था गंभीर झाल्याचे सांगण्यात येत आहे. •➤पान ५ वर

जि.प.च्या नव्या इमारतीची प्रतिक्षा

प्रमोद जाधव

। रायगड ।

रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व. प्रभाकर पाटील यांच्या संकल्पनेतून अलिबागमध्ये ४३ वर्षांपुर्वी जिल्हा परिषदेची भव्यदिव्य इमारत बांधण्यात आली होती. जिल्ह्याचा प्रशासकीय गाडा हाकणाऱ्या अलिबाग येथील रायगड जिल्हा परिषदेच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट माणगाव येथील लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठातील स्थापत्य अभियंत्यामार्फत करण्यात आले होते. या अहवालात ही इमारत धोकादायक असल्याचे सांगण्यात आले होते. त्यामुळे ही इमारत पाडून त्या जागी नव्याने इमारत बांधण्याची हालचाल सुरु झाली आहे. या नव्या इमारतीचे बांधकाम ३६ महिन्यांत पुर्ण करण्याचे आदेश पत्रानुसार देण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या नव्या प्रशासकीय इमारतीची आता रायगडकरांना प्रतिक्षा लागून राहिली आहे.



36 महिन्यांत काम पुर्ण करण्याचे ठेकेदाराला पत्र

अशी असणार इमारत

तळ मजल्यावर पुर्णपणे पार्कींगची व्यवस्था केली जाणार आहे. त्यावर सात मजले असणार आहे. पाणी पुरवठा, आरोग्य, शिक्षण, ग्रामपंचायत, महिला व बालकल्याण, अर्थ व बांधकाम अशी वेगवेगळी कार्यालये एका छताखाली असणार आहेत. साधारपणे ५५० कर्मचाऱ्यांच्या कामासाठी प्रशस्त जागा असणार आहे. अभियंत्यांसाठी स्वतंत्र कक्षाचे नियोजन केले आहे. सीसीटीव्ही कॅमेरांसह संरक्षक भिंतदेखील असणार आहे. दिवाळीनंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असून, याबाबत ठेकेदाराला काम तातडीने सुरु •➤पान ५ वर

एमएसआयडीसीच्या कामावर प्रश्नचिन्ह

- कुरूळ ते बेलकडेपर्यंत कामात अपेक्षित खोली नाही
- रस्ता खचण्याची, खड्डे पडण्याची भीती

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग-रोहा मार्गावरील एमएसआयडीसीच्या रस्त्यांच्या निकृष्ट कामाचा अनुभव ताजा असतानाच कुरूळ तलाव ते बेलकडे फाट्यापर्यंत सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापूर्वीच्या काँक्रिटीकरणासाठी दीड ते दोन फुट खोदाई केली जात होती. मात्र, सध्याच्या कामात अपेक्षित खोलीकरण दिसत नसल्याने रस्ता पुन्हा खचण्याची आणि खड्डे पडण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे एमएसआयडीसी नेमके कोणत्या दर्जाचे काम करत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.



दिवाळीत वाहतूक कोंडीचा फटका

दिवाळी अवघ्या चार दिवसांवर आली असून, खरेदीसाठी आणि सुट्टीचा आनंद घेण्यासाठी गावी येणाऱ्यांची गर्दी वाढू लागली आहे. अशातच ऐन सणासुदीत कुरूळ ते बेलकडे फाटा रस्त्याचे काम सुरू असल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. दिवाळीत अलिबागसह नागाव, मुरूड, रेवदंडा आणि आक्षी येथे पर्यटकांची मोठी गर्दी होणार आहे. याच मार्गावरून पर्यटकांची वाहतूक होणार असल्याने रस्त्याच्या कामामुळे वाहतूक कोंडीचे संकट अधिक गडद होण्याची शक्यता आहे.

अलिबाग-रोहा मार्गावरील बेलकडे ते सहाणपर्यंतच्या रस्त्याचे काम एमएसआयडीसीने केले होते. मात्र, काम पूर्ण होण्यापूर्वीच काँक्रिट रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले. अखेर विभागाला रस्ता फोडून पुन्हा काम करण्याची वेळ आली. आता शिल्लक असलेल्या कुरूळ तलाव ते बेलकडे फाटा या मार्गाचे काम गेल्या आठ दिवसांपासून सुरू आहे. खोदाई करून खडीकरण केले जात असले तरी खोलीकरण कमी असल्याने कामाच्या दर्जाबाबत शंका उपस्थित होत आहे. तसेच, या कामामुळे वाहतूक कोंडीचाही त्रास सहन करावा लागत आहे. •➤पान ५ वर

म्हसळ्यात बालविवाह करून अत्याचार

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा तालुक्यातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील अल्पवयीन मुलींवरील अत्याचार आणि बालविवाहाशी संबंधित दोन स्वतंत्र गंभीर गुन्हे लागोपाठ दाखल झाले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहिल्या प्रकरणात, म्हसळा आदिवासीवाडी येथील अवघ्या १६ वर्षांच्या मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याची तक्रार करण्यात आली आहे. हा प्रकार मे २०२५ ते ३० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत घडल्याचे तक्रारीत सांगण्यात आल आहे. या प्रकरणातील आरोपीदेखील अल्पवयीन असल्याचे समोर आले असून, त्याच्याविरोधात म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दुसऱ्या घटनेने या गंभीर प्रश्नाची तीव्रता आणखी वाढवली आहे. म्हसळा परिसरातील एका अल्पवयीन मुलीसोबत जबरदस्तीने बालविवाह करण्यात आल्याचा प्रकार घडला आहे. तसेच, त्यानंतर तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार करून तिला गर्भवती केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. •➤पान २ वर

सहा वर्षांच्या चिमुरडीवर अतिप्रसंग

पनवेल : उलवे परिसरात अवघ्या सहा वर्षांच्या चिमुरडीवर ४१ वर्षीय व्यक्तीने लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना घडली आहे. या प्रकरणी उलवे पोलिसांनी दिपचंद रामदत्त कांडपाल याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिपचंद कांडपाल हा मूळचा उत्तराखंड येथील असून, कामानिमित्त सध्या उलवे परिसरातील एका चाळीत वास्तव्यास होता. त्याने त्याच चाळीतील एका खोलीत राहणाऱ्या सहा वर्षांच्या बालिकेवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर पीडित बालिकेने घडलेला प्रकार •➤पान ५ वर

अपघातात दुचाकी चालकाचा मृत्यू

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत ते मुरबाड महामार्गावरील सावळे गावानजिकच्या धोकादायक वळणावर दुचाकी आणि कारमध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वार अनंता वाघमारे (३०) या तरूणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अनंता वाघमारे हे कडाव येथून लाखाचीवाडी येथे दुचाकीवरून जात होते. यावेळी, कर्जत-मुरबाड महामार्गावरील सावळे गावानजिकच्या वळणावर एका भरकारने अनंता वाघमारे याच्या दुचाकीला मागच्या •➤पान ५ वर

न्यायालयाच्या आवारात वकिलावर हल्ला

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल न्यायालयाच्या परिसरात पार्किंगच्या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीत झाल्याची घटना घडली. या घटनेत ॲड. जयसिंग शेरे (३४) यांच्या उजव्या गालावर कारच्या चावीला असलेल्या टोकदार व धारदार वस्तूने वार करून त्यांना जखमी करण्यात आले. याप्रकरणी दत्ता पिंगळे याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ॲड. जयसिंग शेरे हे गेल्या सहा वर्षांपासून पनवेल न्यायालयात वकिली व्यवसाय करीत आहेत. घटनेच्या दिवशी सकाळी ते न्यायालयाच्या आवारातील पोर्चमध्ये ॲड. ऋषीकेश बारटक्के यांच्यासोबत उभे होते. त्यावेळी न्यायालयासमोरील निल पार्क सोसायटीच्या प्रवेशद्वाराजवळ पार्किंगच्या कारणावरून ॲड. राजवर्धन पाटील आणि एका व्यक्तीमध्ये वाद सुरू असल्याचे त्यांच्या •➤पान ५ वर



हर्षद, दुहिताच्या गायनाची रसिकांना पर्वणी | पीएनपी नाट्यगृहात कार्यक्रमाचे आयोजन

अलिबागमध्ये रंगणार 'सुरांची पहाट'

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबागमध्ये यावर्षीच्या दिवाळीच्या मंगलमय पहाटेला सुरांची स्वरमयी किनार लाभणार आहे. 'मैफिल, अलिबाग' या संस्थेच्यावतीने रविवारी (दि.८) सकाळी ८ वाजता अलिबाग येथील पीएनपी नाट्यगृहात 'सुरांची दिवाळी पहाट' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण 'इंडियाज गॉट टॅलेंट'चे सेमीफायनलिस्ट हर्षद आणि दुहिता गोळेसर हे प्रतिभावान गायक दाम्पत्य असणार आहेत.

वारकरी परंपरेचा वारसा लाभलेल्या सिन्नर येथील हर्षद गोळेसर यांनी वयाच्या चौथ्या वर्षापासून संगीतसाधना सुरू केली. पुणे विद्यापीठाची बॅचलर ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स पदवी आणि गांधर्व महाविद्यालयाची संगीत विशारद पदवी त्यांनी प्राप्त केली. सध्या पं. प्रसाद खापर्डे यांच्याकडे रामपूर-सहस्वान घराण्याची तालीम सुरू आहे. राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवांत सुवर्णपदके मिळवणाऱ्या हर्षद यांना नुकताच पद्मश्री महेंद्र कपूर पुरस्कारांतर्गत 'यंग अचिव्हमेंट' पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. त्यांच्या 'गणनायका' या स्वरचित गीताला



उत्कृष्ट संगीत संयोजनाचा पुरस्कारही मिळाला आहे.

दुहिता गोळेसर यांनी मुंबई विद्यापीठाची संगीत विषयातील पदवी सुवर्णपदकासह प्राप्त केली असून, सध्या विदुषी शाल्मली जोशी यांच्याकडे जयपूर घराण्याची तालीम घेत आहेत. युवा महोत्सवात सलग तीन वर्षे सुवर्णपदक मिळवणाऱ्या दुहितांनी 'नवरा माझा नवसाचा २' या चित्रपटासाठीही पार्श्वगायन केले आहे.

तसेच, या कार्यक्रमात तबल्यावर निनाद कुणकवळेकर, पखवाजावर कृष्णा नवगिरे, हार्मो नियमवर संस्कार जानोरकर, साइड रिदमवर आकाश बैरागी आणि की-बोर्डवर शुभम यादव यांची साथ लाभणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असून, रसिकांनी आवर्जून उपस्थित राहावे. तसेच, अधिक माहितीसाठी महेश गोडबोले (९७६३९८०५६३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेने केले आहे.

अभिजात संगीताची पर्वणी

१९८९ पासून मैफिल, अलिबागने पं. शिवकुमार शर्मा, पं. हरिप्रसाद चौरसिया, विदुषी प्रभा अत्रे, उस्ताद झाकीर हुसेन यांसारख्या दिग्गज कलाकारांच्या कार्यक्रमांतून अलिबागच्या रसिकांना अभिजात संगीताची समृद्ध पर्वणी दिली आहे. यंदा प्रथमच दिवाळी पहाटेचा कार्यक्रम पीएनपी नाट्यगृहात आयोजित करण्यात आला आहे. यावेळी हर्षद आणि दुहिता गोळेसर हे प्रतिभावान गायक दाम्पत्य प्रमुख आकर्षण असणार आहेत.

राष्ट्रवादी, वादी, प्रतिवादी

पंचवीस वर्षांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली तेव्हा दिल्लीश्वरांपुढे मान न तुकवण्याचा व मराठी स्वाभिमानाचा नमुना म्हणून त्याची तारीफ केली गेली. सोनिया गांधी या इटालियन असल्याचा मुद्दा पुढे करण्यात आला तरी तो महत्वाचा नव्हता. पवार हे जुन्या मुशीतले काँग्रेस कार्यकर्ते आहेत व ते भाजपसारखा संकुचित विचार करू शकत नाहीत हे सर्वांना ठाऊक होते. पवार यांना नामोहरम करण्याचे जे प्रयत्न दिल्लीतील नेते करीत होते त्याची ही प्रतिक्रिया आहे हे उघड आहे. आता त्याच राष्ट्रवादीच्या अजितदादांच्या गटाचे काही नेते आपले घरातले भांडण भाजपच्या दिल्लीतल्या नेत्यांकडे घेऊन गेले आहेत. सोमवारी सुनेत्रा पवार व त्यांचे चिरंजीव पार्थ पवार यांना वगळून आणि त्यांना कोणतीही कल्पना न देता दिल्लीत काही नेत्यांनी अमित शहा यांची भेट घेतली. ही भेट या नेत्यांनी मागितली होती की शहा यांनीच त्यांना बोलावून घेतले याबाबत दोन प्रवाह आहेत. पण छगत भुजबळ, दिलीप वळसे पाटील, प्रफुल्ल पटेल इत्यादी नेते त्यांना भेटले ही सत्य बाब आहे. कारण त्याचे फोटोच प्रसिध्द झाले आहेत. तुमची भांडणे मिटवा अन्यथा, तुम्हाला सोबत ठेवणे कठीण आहे असा संदेश शहा यांनी दिल्याचे बातम्यांमध्ये म्हटले आहे. ज्या पक्षाची स्थापना स्वाभिमानाच्या मुद्द्यावर झाली त्याच पक्षाच्या करंट्या नेत्यांनी आपल्या पक्षातील भांडणे मिटवण्यासाठी दिल्लीतल्या, तेही भाजपच्या नेत्यांच्या पायावर लोळण घ्यावी हे भयंकर आहे. या पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी ही लाजिरवाणी बाब असेल. अर्थात, या पक्षातल्या कळीच्या नारदांपायी हे झाले आहे. त्याचा अनुभव रायगडमध्ये व कोकणात सर्व पक्षांनी पूर्वीच घेतला आहे. ज्यांनी ज्यांनी मदतीचा हात दिला त्यांनाच तुडवून निव्वळ स्वतःचा स्वार्थ साधत पुढे जाणे हे या नेत्यांचे चरित्र आणि चारित्र्य आहे. आता खुद्द स्वतःच्या पक्षातच त्यांनी हे उद्योग सुरू केले आहेत असा त्याचा अर्थ आहे.

भाजपपुढे शरणागती

शरद पवार यांच्यापासून वेगळे झाल्यापासून अजितदादांनी स्वतःचे अस्तित्व भाजपपासून वेगळे राहील याची काळजी घेतली होती. भाजपच्या दबावाला न जुमानता त्यांनी नबाब मलिकांकडे मुंबई महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची सूत्रे दिली. पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये स्वतंत्रपणे निवडणूक लढवली. भाजपवर टीका केली. दादांना ते शक्य होते. कारण त्यांच्यात तशी धमक होती. तीस वर्षांचा अनुभव त्यांच्या गाठीशी होता. सत्ता आणि सहकारात त्यांनी अनेकांना हात देऊन सोबत घेतले होते. पण दादा गेल्यानंतर राष्ट्रवादी सैरभैर झाला. पक्ष फुटू नये म्हणून घाईघाईने सुनेत्रा पवार यांचा शपथविधी करण्यात आला. परंतु सुनेत्रावहिनी अजून तरी नेतृत्वाची काही चमक दाखवू शकलेल्या नाहीत. राज्यकारभारात त्यांना ठसा उमटवायला वेळ लागेल. पण पक्षावरही पुरती पकड त्यांना बसवता आलेली नाही. त्यांच्या वतीने त्यांचे चिरंजीव पार्थ पवार सर्व कारभार पाहतात असे बोलले जाते. पार्थ पवार मुंढवा जमीन प्रकरणात ज्या रीतीने अडकले आहेत ते पाहता त्यांच्या एकूण क्षमतेविषयी शंका यावी अशीच स्थिती आहे. बोर्टॅनिकल सोसायटी या सरकारी संस्थेची जमीन पदरात स्वस्तात पदरात पाडून घेण्यासाठी त्यांच्या कंपनीने बेकायदा व्यवहार करण्याचा प्रयत्न केला. तो सहजपणे उघड झाला. असले व्यवहार करू नये असे खुद्द आपण सांगितले होते असे दादांनी तेव्हा म्हटले होते. एरवीही पार्थ यांची चमक दिसलेली नाही. त्यांच्याकडे भाषणाचे किंवा विचाराचे किंवा संघटना बांधणीचे असे कोणतेही विशेष कौशल्य आहे असे दिसलेले नाही. असे म्हणतात की, पार्थ पवार किंवा त्यांच्या वतीने जे कोणी बोलणारे लोक असतील ते पक्षातील वरिष्ठ नेत्यांना दम देतात, त्यांची मंत्रिपदे का काढून घेऊ नयेत असे विचारत असतात. हे खरे असेल तर काँग्रेसी संघटनेचे मर्मच त्यांना कळलेले नाही. काँग्रेस किंवा अशा कोणत्याही पक्षात तुम्ही सभा गाजवू शकत असाल, जनतेला आपल्या मागे खेचून आणू शकत असाल व आपल्या पक्षातील लोकांना निवडून आणू शकत असाल तरच अशा नेत्याला लोक मानत असतात. पार्थ आणि सुनेत्रा यांचे असे कोणतेही वैशिष्ट्य समोर आलेले नाही. त्यामुळे त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन पक्ष चालवणे हेच त्यांच्या हिताचे आहे.

कार्यकर्त्यांना हे मान्य आहे?

मात्र याचा अर्थ अमित शहांच्या दारात गेलेला गट हा फार सोज्वळ आहे असे समजण्याचे कारण नाही. उलट वर म्हटल्याप्रमाणे यामध्ये एकाहून एक कारस्थानी लोक भरलेले आहेत. प्रफुल्ल पटेल हे त्यांच्या काही जुन्या प्रकरणांमुळे अडचणीत आहेत. शिवाय जनतेत त्यांना काहीही स्थान नाही. दिल्ली दरबारातले नेटवर्किंग आणि हिंदी-इंग्रजी संभाषण या जोरावर ते बराच काळ शरद पवारांचे उजवे हात होते. नंतर त्यांनी पवारांनाच दगा दिला. ज्यांच्याशी त्यांचे पूर्वी कधीच पटले नाही अशा अजितदादांसोबत ते गेले. आता ते आणि काही अन्य काही कारस्थानी नेते यांना आपला पक्ष भाजपमध्येच विसर्जित करावा किंवा आपणच भाजपमध्ये जावे असे वाटते असे म्हणतात. भुजबळ, वळसे पाटील इत्यादींच्या मागे किमान त्यांच्या मतदारसंघाची पुण्याई आहे. पण तेही आता प्रफुल्ल पटेल यांच्या कह्यात गेल्याचे दिसते. सुनेत्रा व पार्थ यांच्या पक्ष चालवण्याच्या हेकेखोर व एकाधिकारशाही कारभारामुळे कदाचित असे झालेले असू शकेल. पण त्यापायी अमित शहा यांच्याकडे जाणे व त्यांना आपल्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप करण्याची संधी देणे हे राष्ट्रवादीच्या बाण्याला साजेसे नाही. मध्यंतरी दोन्ही राष्ट्रवादी एक होण्याची चर्चा चालू होती. त्याही वेळी असा निर्णय भाजपच्या संमतीशिवाय होऊ शकत नाही असे वक्तव्य देवेंद्र फडणवीसांनी केले होते. नंतर त्यांनी सारवासारव केली होती व दादांचा पक्ष एनडीएचा भाग असल्याने आपण तसे बोललो असे म्हटले होते. पण एनडीएतील सर्व पक्षांचे कारभार नियंत्रित करण्याची भाजपची महत्वाकांक्षा लपून राहिलेली नाही. हे ओळखूनच एकनाथ शिंदे यांनी याबाबत शरणागती पत्करली आहे. ते उठसूठ दिल्लीला जाऊन अमित शहांची भेट घेतात व ते खूष राहतील हे पाहत असतात. शिंदे यांच्या पक्षाच्या अधिवेशनात पहिला ठराव हा मोदींचे अभिनंदन करणारा असतो. तरीही शिंदे यांच्या पक्षातील अंतर्गत भांडणांमध्ये भाजपला अजून शिरकाव करता आलेला नाही. राष्ट्रवादी हा शिंदे यांच्या गटाहून बराच जुना पक्ष आहे. त्यातले काही नेते तर शिंदे यांच्या दुपटीहून अधिक वयाचे आहेत. तरीही त्यांना आपला पक्ष सांभाळता येत नाही. भाजपसोबत राहायचे, पण स्वतःचे वेगळे अस्तित्व ठेवायचे हे दादांना जमले. कारण भाजपला शह देण्याची त्यांच्यात धमक होती. राष्ट्रवादीमध्ये आज जे वादी आणि प्रतिवादी तयार झाले आहेत त्या दोन्ही गटातल्या कारस्थानी नेत्यांचे हात दगडाखाली आहेत. त्यामुळे भाजप आणि शहांची हुजरेगिरी करण्याखेरीज त्यांना दुसरा पर्याय नाही. प्रश्न असा आहे की, राष्ट्रवादीच्या स्वाभिमानी कार्यकर्त्यांना हे सर्व मंजूर आहे काय?

विचार

रस्त्यावरचा संघर्ष काय साधणार?

निवडणूक आयोग विरुद्ध विरोधी पक्ष या लढाईने देशातील वातावरण ढवळून टाकले. सत्ताधारी अत्यंत ठामपणे या सर्व उद्रेकाला सामोरे जात आहेत. उद्रेक, अशांतता मात्र थांबायचे नाव घेत नाही. अनेक गट, पक्ष, युत्या, नाराज राजकारणी निवडणूक आयोगाविरुद्ध दंड थोपटत असून सरकारला खिंडीमध्ये पकडायचा प्रयत्न करत आहेत. त्यातून देशात रस्त्यावर लढाई पेटल्यासारखी परिस्थिती पहायला मिळत आहे.



डॉ. सुकृत खांडेकर

एखाद्या विषयावर रान उठावे तसे काहीसे वातावरण देश सध्या अनुभवत आहे. निवडणूक आयोग विरुद्ध देशातील राजकीय पक्ष, विशेषत: काँग्रेस पक्ष या लढाईने देशातील वातावरण ढवळून टाकले आहे. सत्ताधारी अत्यंत ठामपणे या सर्व उद्रेकाला सामोरे जात आहेत. उद्रेक, अशांतता मात्र थांबायचे नाव घेत नाही. अनेक गट, पक्ष, युत्या, नाराज राजकारणी निवडणूक आयोगाविरुद्ध दंड थोपटत असून सरकारला खिंडीमध्ये पकडायचा प्रयत्न करत आहेत. त्यातून देशात रस्त्यावर लढाई पेटल्यासारखी परिस्थिती पहायला मिळत आहे. अर्थातच यामागे निवडणूक आयोगाची मतदार सर्वेक्षण मोहीम आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून सात ते आठ वेळा मतदार याद्यांचे सर्वेक्षण (एसआयआर) झाले. गेल्या पंचाहत्तर वर्षांमध्ये २६ मुख्य निवडणूक आयुक्त झाले, पण यापुर्वी कोणताही मुख्य निवडणूक आयुक्त आजच्यासारखा वादाच्या भोवऱ्यात सापडला नव्हता. मुख्य निवडणूक आयुक्तांना कायद्याचे व घटनेचे संरक्षण आहे, सरकारला त्यांना पदावरून तडकाफडकी हटवता येत नाही, त्यांना हटवण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहेत की नाही हे स्पष्ट झालेले नाही. राष्ट्रपतीच त्यांच्या भवितव्याविषयी निर्णय घेऊ शकतात. राष्ट्रपतींकडे राहुल गांधींसह इंडिया आघाडीतील दहा पक्षांच्या नेत्यांचे शिष्टमंडळ थडकले तेव्हा त्यांच्याकडे पुरावे मागितले असे प्रसिध्द झाले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधिशांनीही न्यायालयाला राजकारणात ओढू नका, असे बजावले. या पार्श्वभूमीवर गेले काही दिवस दिल्ली, मुंबई तसेच देशाच्या अन्य शहरांमध्ये 'ज्ञानेशकुमार हटाव'चा आक्रोश चालू आहे, तो अर्थहीन आहे असे मानायचे का, असा प्रश्न पडतो.

इंडियन एक्सप्रेसने निवडणूक आयोगाची पोलखोल केल्यानंतर विरोधी पक्ष मुठी आवळून आंदोलन करू लागल्यास त्याला कहीच आधार नाही का, असा प्रश्न पडतो. देशाची राजधानी दिल्लीही गेले काही दिवस पोलिसांची छावणी बनली. क्रॉक्रोच जनता पार्टीचे अध्यक्ष अभिजीत दीपके यांनी जंतरमंतर येथे 'ज्ञानेशकुमार मस्ट गो' अशी मागणी करत आंदोलन करण्याचे जाहीर केल्यापासून जंतरमंतर मैदान पोलिसांनी वेढा घालून आणि उंच बॅरिकेटचे जाळे उभारून सीलबंद केले. अगोदरपासून नेहा बोरा यांच्या स्टुडंट असोसिएशन ऑफ इंडिया तसेच काँग्रेस पक्षाचे उग्र आंदोलन चालूच होते. आजही ते सुरू आहे. जंतरमंतरच नव्हे तर दिल्लीच्या रस्त्यावर कुणीही आंदोलक दिसता कामा नये, अशी खबरदारी यावेळी दिल्ली पोलिसांनी घेतली. सोळा ते पंचवीस वयोगटातील हजारो मुले तिरंगा घेऊन रस्त्यावर उतरले, पण पोलिसांनी त्यांना बकोटीला धरून, गचांडी पकडून, गळ्याभोवती नि कमरेभोवती विळखे घालून उचलले, फरफटत नेले आणि बसेसमधे कोंबून डिटेंशन सेंटरमधे नेले. मुलींचे विनयभंग, त्यांचे केस ओढणे किंवा कपडे फाडणे अशाही क्लिप्स सोशल मिडियावर व्हायरल झाल्या. आम्हाला का पकडता आहात, आम्ही काय गुन्हा केला आहे, आमची चूक काय आहे, आम्हाला कुठे नेता आहात, कशासाठी मारत आहात असे प्रश्न मुले-मुली पोलिसांना विचारताना दिसतात. पोलिसांना सामोरे जात तुम्ही कोण आहात, आम्हाला पकडण्याचे आदेश तुम्हाला कुणी दिले, तुमच्या युनिफॉर्मवर तुमची नेम प्लेट आणि बॅज (बक्कल क्रमांक) का नाही, तुमच्याकडे ओळखपत्र आहे का अशा प्रश्नांचा भडिमार ही जेन झी करताना दिसली.

आंदोलनादरम्यान अनेक ठिकाणी मुलांचे मोबाईल फोन काढून घेतले गेले. पत्रकारांकडे बूम व ओळखपत्र असुनही पोलिसांनी उचलले. काही ठिकाणी पत्रकारांचे कॅमेरे काढून घेतल्याच्या तक्रारी ऐकायला मिळत आहेत. पोलीस असे का वागतात, त्यांच्याकडे एवढा क्रूरपणा कुठून येतो, त्यांच्या घरी, आजुबाजुला किंवा नात्यागोत्यात जेन झी मुले-मुली नाहीत का असे प्रश्न या निमित्ताने उभे राहिले. विद्यार्थी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या घराबाहेरही पोलीस उभे असल्याचे पहायला मिळाले. तिथल्या सोसायट्यांम धील रहिवासी हैराण झाले आहेत. ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात रस्त्यावर आंदोलन होता कामा नये म्हणून दिल्ली पोलीस दहशत कशी निर्माण करत आहेत हेच चित्र यातून देशाला दिसले. क्रॉक्रोच जनता पार्टीला आंदोलनासाठी परवानगी मागायला उशीर झाला, असे पोलिसांनी म्हटले खरे, पण आंदोलन सुरू होण्याच्या अगोदरच ३० हजार पोलीस, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव दलाच्या फौजा, ३०० सीसी टीव्हीचे जाळे, रस्त्यावर दहा फूट उंचीचे सहा पदरी बॅरिकेट्स तातडीने कसे उभारले गेले, असा प्रश्न पडतो. मनात आणले तर पोलीस काहीही करू शकतात हे दिल्ली पोलीसांनी दाखवून दिले. 'ज्ञानेशकुमार हटावो' आंदोलनात कुणीही 'बंद' ची हाक दिली नव्हती. मात्र रेल्वे बंद, मेट्रो बंद, रस्ते बंद, इंटरनेट बंद, सर्वत्र पोलिसच पोलीस, आंदोलकांना उचलण्यासाठी बसेसच्या रांगा, डिटेंशन सेंटर्स अशी जय्यत तयारी करून दिल्लीत अघोषित 'बंद'चे वातावरण कोणी निर्माण केले?

एका उच्चपदस्थ नोकरशहाला संरक्षण देण्यासाठी मायबाप सरकार किती तत्पर आहे हे गेल्या काही दिवसांमध्ये देशाला दिसले. दिल्ली पोलिसांनी यावेळी जेन झीवर लाठीमार केला नाही, अश्रुधूर सोडला नाही, पाण्याचे फवारे मारले नाहीत, पॅलेट गन्समधून गोळीबार केला नाही. कारण आंदोलकांना कुठेही एकत्र येऊच दिले नाही. दिसला की पकड, उचल आणि बसमध्ये कोंब... असे तंत्र पोलिसांनी अवलंबले. एका मोटारीत पोलिसांचे ढिगभर गणवेष दिसले, पण ते कुणाचे, कोणी आणले, कुणासाठी हे गूढ कायम राहिले. जंतरमंतरवर आंदोलन करण्यास बंदी घालणारा फतवा सरकारने काढला. यापुढे जंतरमंतरवर यायचेच नाही असे आंदोलकांना बजावले. अभिजीत दीपके, सौरभ दास आणि आशुतोष रांका यांना दिल्ली पोलिसांनी विमानात घुसून अटक केली. दुसऱ्या दिवशी पन्नास हजाराचा जामीन आणि वर्षभर शांततेचा भंग करणार नाही, अशा लेखी हमीवर न्यायालयाने त्यांची सुटका केली. खरे तर ते विमानातून दिल्लीच्या रस्त्यावर उतरलेही नव्हते. विमानात घुसून त्यांना पोलीस अटक करतात, हे गंभीर होते. ते गुन्हेगार, गँगस्टर किंवा इंटरपोलच्या वॉंटेडच्या यादीवर नव्हते. त्यांनी एखाद्या बँकेची हजारो कोटी रूपयांची फसवणूक केली नव्हती किंवा ते देशद्रोहीही नव्हते. सीजेपीच्या तिशी-पस्तीशीतल्या उच्चशिक्षित नेत्यांना आम्ही केव्हाही, कसेही उचलू शकतो हाच संदेश दिल्ली पोलिसांनी अलिकडील आंदोलनातून दिला.

ज्ञानेशकुमार यांना मुख्य निवडणूक पदावरून हटवण्याची सरकारची इच्छा दिसत नाही. त्यांच्या विरोधात सुरू झालेल्या आंदोलनाविषयी पंतप्रधान किंवा गृहमंत्री ब्र सुध्दा काढत नाहीत. भाजपाचे प्रवक्ते तसेच मुख्यमंत्री आंदोलकांना अराजक निर्माण करायचे आहे, असे रोज सांगत असतात. भाजपा मोदींमुळे निवडणुका जिंकत नाही, तर निवडणूक आयोग आणि ज्ञानेशकुमार यांच्या मदतीमुळे ते शक्य होते, असे ठसवायला इंडिया आघाडीने सुरूवात केली आहे. निवडणूक आयोगाचा कारभार म्हणजे, 'दया तो कुछ गडबड है' असे जनतेला वाटू लागले आहे. ज्ञानेशकुमार हे सरकारला उपयुक्त असले तरी त्यांना यापुढे मुख्य निवडणूक आयुक्तपदावर ठेवणे सरकारला कितपत परवडेल? त्यांना हटवले तर सरकारच्या मर्जीतील अन्य नोकरशहांनाही मानसिक धक्का बसू शकतो. आज आपला वापर करणारे उद्या आपल्याला वाचवू शकणार नाहीत, हा संदेश जाऊ शकतो. स्वत: ज्ञानेशकुमार हे आपल्याला मेसेजेस पाठवतात, असा गौप्यस्फोट राहुल गांधींनी केला आहे, ते मुख्य गुन्हेगार नाहीत, त्यांनी राजीनामा देऊन माफीचा साक्षीदार बनावे आणि 'व्होट चोरी'मध्ये कोण कोण आहेत हे उघड करावे, असे खुले आवाहन राहुल यांनी त्यांना केले आहे. सरकारमधील दोनशे अधिकारी आपल्या संपर्कात असून सर्व माहिती देत असतात, या राहुल गांधींच्या वक्तव्याने सरकारमधील अनेकांची झोप उडाली असेल. परिणामी, संघर्षाचा केंद्रबिंदू ज्ञानेशकुमार बनले आहेत. रस्त्यावरील या लढाईमध्ये काँग्रेस किती तग धरते आणि ज्ञानेशकुमार पदावर राहतात का, हे आता बघायचे.

चर्चा आजची

फटाक्यांना विरोध नाही, पण...



संतोष राऊळ

सध्या सर्वत्र दिवाळीची लगबग सुरू आहे. प्रत्येक घराघरांतील साफसफाई अंतिम टप्प्यात आली आहे. तसेच, दिवाळीनिमित्त फराळ बणविण्याची घाई प्रत्येक महिला वर्गात दिसून येत आहे. त्यातच दिवाळी म्हटलं की, आकर्षक पणत्या, कंदिल, विजेवर चालणारी तोरणं आणि महत्त्वाचं म्हणजे फटाके. या गोष्टींशिवाय दिवाळी अपूरीच वाटते. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यातील प्रत्येक नाक्या नाक्यावर फटाक्यांची दुकाने थाटली जात आहेत. या ठिकाणी विविध प्रकारचे फटाके आकर्षणाचा विषय ठरत आहेत. दरवर्षी नवनविन फटाके बाजारात येत असतात. त्यातील काही फटाके मोठा आवाज करतात तर काही फटाके फक्त रोषणाई करून जातात. जरी हा फटाका लहान असला किंवा मोठा असला तरी, त्यातुन निघणारा धूर हा घातकच आहे. त्याचा त्रास पहिले फटाके वाजवणाऱ्याला त्यानंतर जगाला होतो. काही प्रमाणात फटाके लावले तरी काही हरकत नाही. परंतु, आवाजवी फटाके लावून ध्वनीप्रदुषणासह वायुप्रदुषण करणे अत्यंत चुकीचे आणि धोकादायक आहे. मुंबई सारख्या शहरात फटाके वाजविण्याबाबत मोठे निर्बंध लावण्यात आले आहेत. नुकतेच हिंदी चित्रपटातील अभिनेत्री दिया मिर्जा हिने दिवाळीत फटाके न लावता दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले होते. त्यावर खुद्द मुंबईच्या महापौरांनी आक्षेप घेत ती आवाहन करणारी व्हिडीयो समाजमाध्यमावरून हटवायला लावणं ही अत्यंत खेदाची बाब आहे. याउलट त्यांनीच जनतेला याबाबत आवाहन करायला हवं होतं. शेवटी हायकोर्टाने त्यांना खडसावलचं; त्यामुळे सर्वसामान्य जनतेकडूनही महापौरांच्या वागण्यावरून नाराजी व्यक्त केली जात आहे.

खरतर दिवाळी हा हिंदू धर्मातील सर्वात मोठा सण असून, अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि अज्ञानावर ज्ञानाचा विजय दर्शवणारा सण आहे. यामागे काही मुख्य पौराणिक आणि ऐतिहासिक कारणे देखील आहेत. प्रभू श्रीराम, माता सीता व लक्ष्मण रावणाचा पराभव करून आणि १४ वर्षांचा वनवास संपवून अयोध्येत परतले. त्यांच्या स्वागतासाठी अयोध्येतील लोकांनी घरोघरी दिव्यांची आरास केली. त्यानंतर भगवान श्रीकृष्णाने अत्याचारी नरकासूर राक्षसाचा वध करून त्याच्या कैदेतून १६,००० स्त्रियांना मुक्त केले. या दिवसाचे प्रतीक म्हणून नरक चतुर्दशी व दिवाळी साजरी केली जाते. तसेच, समुद्रमंथनादरम्यान कार्तिक अमावस्येच्या दिवशी संपत्ती आणि समृद्धीची देवी माता लक्ष्मी प्रकट झाली होती, त्यामुळे या दिवशी लक्ष्मीपूजन केले जाते. त्याचबारोबर महाभारतात १३ वर्षांचा वनवास पूर्ण करून पांडव या दिवशी हस्तिनापुरात परतले होते, त्याचा आनंद नागरिकांनी दिवे लावून साजरा केला होता. त्यामुळे दिवाळी साजरा करण्याचे हे काही मुख्य संदर्भ पुराणात आढळून येतात. महत्त्वाचं म्हणजे या सर्व गोष्टींमध्ये दिवे लावून आनंद साजरा केल्याचे वर्णन आहे. त्या काळी फटाके हा विषयच नव्हता. आता बदलत्या काळात फटाक्यांना दिव्यांपेक्षा जास्त महत्त्व प्राप्त होत चालले आहे.

मुळात आताच्या पिढीला आपण दिवाळी साजरी का करातो? हेच माहिती नाही. खरंतर जुन्या पिढीने त्यांना सांगण गरजेचं आहे. परंतु, तेवढी देखील तसदी घेताना कोणी दिसत नाही. खरंतर शैक्षणिक शिक्षणात यासंदर्भात अभ्यास असणं गरजेचं आहे. जरी हा विषय दैवावर असला तरी, मुघलांच्या इतिहासापेक्षा हा इतिहास सांगण केव्हाही चांगलचं ना, असंही सर्वसामान्य जनतेमधून बोलले जात आहे. त्यामुळे दिवाळीत फटाके लावल्यावरच दिवाळी सण साजरी होते, हा निव्वळ अंधविश्वास असल्याचे जाणकरांकडून बोलले जात आहे. इथे फटाके लावण्यावर शंभर टक्के विरोध नाही. परंतु, इतरांसह पर्यावरणाचा देखील विचार करणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे. त्यातच मुंबईसह इतर काही शहरांत प्रदुषणाचे प्रमाण देखील प्रचंड वाढले आहे. यापार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासनाने फटाके लावणाऱ्यांवर काही प्रमाणात निर्बंध लावण्याची गरज असल्याचे देखील बोलले जात आहे. फटाक्यांमुळे जरी नेत्रसुख मिळत असले तरी त्याचे अतिप्रमाण स्वत:सह इतरांनाही धोकादायक ठरू शकतं, असं जाणकारांकडून सांगण्यात येत आहे.

लोकसंसद

प्रदूषणाच्या धुरक्यात हरवली मुंबई!

गेले अनेक दिवस मुंबई धुक्यात नव्हे तर धुरक्यात (धूर व धुके यांचे मिश्रण) हरवली आहे. सध्या नागरिकांना अत्यंत प्रदूषित हवेचा सामना करावा लागतो आहे. मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक १४४ (बोरीवली पूर्व) ते १७८ (वांद्रे पश्चिम) च्या दरम्यान असून सरासरी १५५ च्याआसपास पोहोचला आहे. १५५ म्हणजे प्रदूषित आणि वाईट हवा. ही हवेची पातळी संवेदनशील व्यक्तींसाठी आणि सामान्य नागरिकांसाठीही 'अस्वास्थ्यकर' मानली जाते. एकीकडे मुंबईत वाहनांमुळे वाढलेले प्रदूषण, इमारती तसेच रस्ते, मेट्रो इत्यादी पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांच्या बांधकामामुळे प्रदूषणाच्या पातळीत प्रचंड वाढ झाली असताना त्यातच डम्पिंग ग्राउंडवरील कचऱ्याला लागणाऱ्या आगी आणि मुंबईच्या परिघातील कारखान्यांचा धूर मिसळतो आहे. भरीस भर म्हणून धूलिकण आणि प्रदूषके वाहून नेणाऱ्या समुद्रातील वाऱ्याचा वेगही कमी झाला आहे. रात्री ६० ते ७० टक्क्यांपर्यंत वाढत जाणारी वातावरणातील आर्द्रता हवेतील प्रदूषके साचून राहण्यास कारणीभूत ठरली आहे. सर्वत्र पसरलेल्या धुरक्यामुळे वातावरणातील दृष्यमानताही कमी झाली आहे. वाढत्या प्रदूषणाचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून श्वसनाच्या दम्यासारख्या आजारांबरोबरच सर्दी, खोकला, घसा खवखवणे, अशा रुग्णांची संख्या वाढली आहे. अशा परिस्थितीत पालिकेने बांधकामाच्या ठिकाणी अँटी-स्मॉग गन वापरणे, रस्ते नियमितपणे पाण्याने धुणे आणि धूळ नियंत्रणाचे कडक नियम लागू करणे गरजेचे आहे.

– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

दिन दिन दिवाळी, गायी म्हशी ओवाळी



दिवाळी हा असा सण आहे ज्याची अगदी लहान मुलांपासून वृद्ध लोकांपर्यंत प्रत्येक जण आतुरतेने वाट बघत असतो. अनेक लोकांच्या मते केवळ लक्ष्मीपूजन म्हणजे दिवाळी असते, मात्र या दिवाळी सणांमध्ये अनेक वेगवेगळ्या सणांचा देखील समावेश असतो. ज्यामधील एक उत्कृष्ट सण म्हणून वसुबारस या सणाला ओळखले जाते. दिवाळी सणातील सर्वात पहिला दिवस म्हणून वसुबारस ओळखली जाते. त्यानंतर धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा, भाऊबीज इत्यादी सणांची रेलचेल सुरू होते. दिवाळीतील सर्वात पहिल्या दिवशी अर्थात वसुबारस या दिवशी गाय आणि वासरू या दोघांचीही मनोभावे पूजा केली जाते.

हिंदू धर्मात गाय, वासरू आणि बैल यांना विशेष स्थान आहे. शेती आणि ग्रामीण जीवनात या पशुधनाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यामुळे वसुबारसच्या दिवशी त्यांची पूजा करून त्यांच्याप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा प्राचीन काळापासून चालत आली आहे. धार्मिक मान्यतेनुसार, वसुबारसच्या दिवशी गायीची पूजा केल्याने घरात सुख-समृद्धी आणि भरभराट येते. कुटुंबात धनधान्याची कमतरता भासत नाही आणि घरात नेहमी आनंदाचे वातावरण राहते, असे मानले जाते. शेतकऱ्यांसाठी हा दिवस अधिक खास असतो. शेतीच्या कामात मदत करणाऱ्या आणि शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध करणाऱ्या पशुधनाचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे. गाय, वासरू आणि बैल यांची पूजा केल्याने त्यांचा आशीर्वाद कुटुंबावर कायम राहतो आणि घरात सुख, शांती व समृद्धी नांदते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. वसुबारसच्या दिवशी सकाळी लवकर उठून घराची स्वच्छता केली जाते. त्यानंतर गाय आणि तिच्या वासराला स्वच्छ करून सजवले जाते. त्यांच्या कपाळावर हळद-कुंकू लावले जाते. गळ्यात फुलांच्या माळा घातल्या जातात. त्यानंतर गायीला नैवेद्य दाखवून तिची आरती केली जाते. काही ठिकाणी गायीला पुरणपोळी, गोड पदार्थ, चारा आणि इतर खाद्यपदार्थ खाऊ घालण्याची परंपरा आहे. पूजा करताना कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली जाते. ज्या ठिकाणी गाय उपलब्ध नसते, तिथे काही कुटुंबांमध्ये गायीचे चित्र किंवा प्रतिमा ठेवून पूजा केली जाते. महाराष्ट्रात अनेक महिला वसुबारसच्या दिवशी उपवास करतात. कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी आणि घरातील सदस्यांच्या कल्याणासाठी हे व्रत केले जाते. काही पारंपरिक पद्धतींमध्ये या दिवशी गहू आणि मूग खाणे टाळले जाते. काही कुटुंबांमध्ये उपवासाच्या दिवशी दूध आणि दुग्धजन्य पदार्थही सेवन केले जात नाहीत. मात्र, उपवासाचे नियम प्रत्येक कुटुंबाच्या परंपरेनुसार वेगवेगळे असू शकतात. वसुबारस हा केवळ पूजा-अर्चनेपुरता मर्यादित असलेला सण नाही. या सणातून प्राणीमात्रांप्रती प्रेम, दया आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा संदेश मिळतो. मानवी जीवनात प्राण्यांचे योगदान किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव हा सण करून देतो. निसर्ग, पशुधन आणि पर्यावरण यांचा आदर करणे ही भारतीय संस्कृतीची परंपरा आहे. त्यामुळे वसुबारस हा सण धार्मिक महत्त्वासोबतच सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही महत्त्वाचा आहे.

पान ३ वरुन

जि.प.च्या नव्या इमारतीची प्रतिक्षा

करण्याचे पत्र बांधकाम विभागाकडून देण्यात आले आहे. रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व.प्रभाकर पाटील यांच्या काळात १९७८ साली अलिबागमध्ये अद्ययावत अशी जिल्हा परिषदेची भव्य इमारत उभारण्यात आली. १९८३ साली काम पूर्ण झाल्यावर इमारतीला 'शिवतीर्थ' असे नाव देण्यात आले. या इमारतीत जिल्हा परिषद अध्यक्षांसह उपाध्यक्ष, स्थायी व विषय समितीचे सभापती, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच समाजकल्याण, दिव्यांग विभाग, महिला व बालकल्याण विभाग, अर्थ व बांधकाम विभाग अशा वेगवेगळ्या विभागाची कार्यालये एका छताखाली आणण्याचा प्रयत्न स्व. प्रभाकर पाटील यांनी केला. या इमारतीला ४३ वर्षे पुर्ण झाली असून, समुद्रकिनाऱ्यालगत ही इमारत असल्याने तसेच इमारतीमध्ये पावसाच्या पाण्यामुळे होणारी गळती भिंती, छतांची वारंवार दुरुस्ती करावी लागत होती. या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट चार वर्षांपुर्वी करण्यात आले होते. या अहवालानुसार, इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात संरचनात्माक दुरुस्त्या करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. तसेच, ही इमारत भुकंपीय क्षेत्र चारमध्ये असल्याने एखादा भूकंप झाल्यास मोठा अनर्थ ओढावण्याची भिती निर्माण झाली होती. तसेच, या इमारतीमध्ये प्रशासकीय दृष्ट्या कर्मचारी बसण्यासाठी व कार्यालयीन कामकाजासाठी पुरेशी जागा नव्हती, असे कारण सांगून ही इमारत तोडण्यात आली. सध्या जिल्हा परिषदेचा कारभार कुंटेबाग येथील जागेतून चालत आहे.

नव्याने बांधण्यात येणाऱ्या इमारतीचा अपेक्षीत खर्च १२५ कोटी रुपयांचा आहे. हे काम पुणे येथील मे टी ॲन्ड टी इन्फ्रा लिमीटेड या कंपनीला देण्यात आले आहे. त्यासाठी वेगवेगळ्या विभागाची परवानगी घेण्यात आली आहे. तसेच, सात मजली नव्याने बांधण्यात येणारी नवी इमारत पाडलेल्या जुन्या इमारतीच्या जागीच उभी करणार आहेत. तर, दुसरी इमारत अलिबाग पंचायत समिती कार्यालयाजवळ बांधण्यात येणार आहे. ती इमारत पाच मजली असणार आहे. त्यासाठी नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी हालचाल सुरु झाली आहे. दिवाळीनंतर या इमारतीच्या प्रत्यक्षा कामाला सुरुवात होण्याची शक्यात आहे. या इमारतीच्या बांधकामासाठी राज्य सरकारकडून निधीही प्राप्त झाल्याची माहिती जिल्हा परिषदेकडून उपलब्ध झाली आहे.

ठेकेदाराला काम सुरु करण्याचे पत्र

पुणे येथील प्रो.प्रा. शिवराम थोरवे यांना या इमारतीच्या बांधकामाचा ठेका दिला आहे. त्यांनी भरलेली निविदा सक्षम अधिकाऱ्यांनी मंजूर केली आहे. कामाची सुरुवात त्वरित सुरू करण्यात यावे. काम ३६ महिन्यांपर्यंत म्हणजे तीन वर्षात पुर्ण करण्याची मुदत आहे. असे पत्र जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडून देण्यात आले आहे.

म्हसळ्यात बालविवाह करून अत्याचार

हा प्रकार जानेवारी ते ३१ ऑक्टोबर या कालावधीतील घडला असून, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ अंतर्गत शासन नियुक्त बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांची महत्त्वाची वैधानिक जबाबदारी आहे. महिला व बालविकास विभागाच्या यंत्रणेने ग्रामपंचायत, नगरपंचायत, पोलीस, शिक्षण आणि आरोग्य विभागाच्या समन्वयातून प्रभावी जनजागृती करणे आणि बालविवाह रोखण्यासाठी वेळीच हस्तक्षेप करणे अपेक्षित आहे. परंतु, म्हसळा तालुक्यात बालविवाह प्रतिबंधक यंत्रणेची जनजागृती कितपत प्रभावी आहे? अल्पवयीन मुलींच्या संरक्षणासाठी नियुक्त यंत्रणा किती सतर्क आहे? आणि अशा घटना घडू नयेत यासाठी प्रशासनाकडून नेमक्या कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत? हे प्रश्न आता जनमानसातून उपस्थित होत आहेत.

सहा वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार

आपल्या पालकांना सांगितला. त्यानंतर संतप्त कुटुंबीयांनी तातडीने उलवे पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीविरोधात संबंधित कायदेशीर कलमांनुसार गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. अवघ्या सहा वर्षांच्या बालिकेसोबत घडलेल्या या घटनेमुळे उलवे परिसरात संताप व्यक्त होत असून, बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

शाहीर बादल यांचे पाण्यात आंदोलन

हातात डफली आणि काठी घेऊन ते या पाण्यात उभे आहे. बादल यांच्या प्रकृतीची काळजी घेण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे. त्यांच्या आंदोलनामुळे पेज नदीपात्रातील जलआंदोलन आणि साई डोंगरातील वृक्षतोडीचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. या आंदोलनाला पाली गावातील ग्रामस्थ आणि आदिवासी बांधव मदत करत आहेत.

एमएसआयडीसीच्या कामावर प्रश्नचिन्ह

याबाबत एमएसआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, बेलकडे ते कुरूळ हा रस्ता अरुंद असून, वाहनांची वर्दळ मोठी आहे. अधिक खोलीकरण केल्यास कामाला विलंब होऊन नागरिकांना अधिक दिवस वाहतूक कोंडीचा सामना करावा लागेल. त्यामुळे खोदाई कमी केली आहे. मात्र, सर्व्हेक्षणानुसारच काम सुरू असून, पुढील पाच वर्षे देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी ठेकेदाराची राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

न्यायालयाच्या आवारात वकिलावर हल्ला

निदर्शनास आले. वादादरम्यान संबंधित व्यक्तीने ॲड. राजवर्धन पाटील यांची कॉलर पकडून त्यांना धक्काबुक्की केल्याचे शेरे यांनी पाहिले. यावेळी शेरे, ॲड. ऋषीकेश बारटक्के आणि झेरॉक्स दुकानाचे मालक रोशन पाटील यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, संबंधित व्यक्तीने शेरे यांना शिवीगाळ करीत त्यांच्या अंगावर धाव घेतली आणि कॉलर पकडून धक्काबुक्की केली. त्यानंतर कारच्या चावीला असलेल्या टोकदार व धारदार वस्तूने त्यांच्या उजव्या गालावर वार करून त्यांना जखमी केले. घटनेनंतर निल पार्क सोसायटीचे पदाधिकारीही भांडण सोडविण्यासाठी पुढे आले. त्यानंतर जखमी शेरे आणि ॲड. राजवर्धन पाटील हे तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात गेले. पोलिसांनी मदत देत दोन कर्मचाऱ्यांसह त्यांना पुन्हा घटनास्थळी पाठविले. त्यावेळी संबंधित व्यक्ती तेथेच कारसह उभी असल्याचे आढळून आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव दत्ता मोतीराम पिंगळे असल्याचे सांगितले. दरम्यान, ॲड. शेरे यांनी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे उपचार घेतल्यानंतर संबंधित व्यक्तीविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली. न्यायालयाच्या परिसरातच वकिलाला मारहाण झाल्याने या घटनेची चर्चा सुरू झाली आहे.

परहूरपाडा येथील फार्महाऊस लुटले

सोन्याची अंगठी आणि ६० हजार रुपयांचा सोन्याचा झुमका असा एकूण दोन लाख ८० हजार रुपयांचा सोन्याचा ऐवज चोरट्यांनी गायब केला. ही बाब येथील केअर टेकरच्या लक्षात येण्यापुर्वी चोरट्यांनी तेथून पळ काढला. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात चोरट्यांविरोधात गून्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार म्हात्रे यांच्याकडून सुरु आहे.

अपघातात दुचाकी चालकाचा मृत्यू

बाजूने जोरदार धडक दिली. या धडकेत त्यांना जबर मार लागून ते रस्त्यावर कोसळले. कशेळे चेकपोस्टवरील कर्जत पोलिसांनीही घटनास्थळी पोहोचून त्यांना तातडीने कर्जत उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. परंतु, तेथील उपस्थित डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.

श्रीवर्धन मासळी बाजार दुरुस्तीची निविदा प्रसिद्ध

दुरुस्तीनंतर तरी रस्त्यावर मच्छी विकणाऱ्या महिला मार्केटमध्ये जाऊन बसणार का?

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन येथे मच्छी विक्री करणाऱ्या महिलांसाठी श्रीवर्धन नगरपरिषदेचे मच्छी मार्केट उपलब्ध आहे. परंतु सदर मच्छी मार्केट हे जुने असल्यामुळे त्याची दुरुस्ती करण्याची आवश्यकता होती. याची गरज ओळखून नगर परिषदेने सदर म च्छी मार्केटच्या दुरुस्तीच्या कामाची निविदा प्रसिद्ध केली आहे. लवकरच मच्छी मार्केटच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात येणार असून काम घेणाऱ्या ठेकेदाराने हे काम १५ दिवसात पूर्ण करून द्यावयाचे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून श्रीवर्धन येथे मच्छी मार्केट उपलब्ध असताना सुद्धा मच्छी विक्री करणाऱ्या महिला खुलेआम पणे जुना एसटी स्टँड येथील रिक्षा स्टॅन्ड समोर रस्त्यावरती मच्छी विक्री करण्यासाठी बसत असतात. मच्छीच्या टोपलीतून सांडलेले पाणी व त्या ठिकाणी मच्छी कापल्यानंतर टाकण्यात येणारे मच्छीचे तुकडे यामुळे या परिसरामध्ये कायमच दुर्गंधी पसरलेली पाहायला मिळते.

पूर्वी मच्छी विक्री करणाऱ्या महिला मच्छी मार्केटमध्ये मच्छी विक्रीसाठी बसत असत. त्यावेळी संध्याकाळच्या वेळेस नगर परिषदेचे कर्मचारी संपूर्ण मच्छी मार्केट पाण्याने धुऊन काढत असत. त्या ठिकाणी फिनेल देखील टाकत असत. त्यामुळे सकाळी मच्छी मार्केटमध्ये गेल्यानंतर कोणत्याही प्रकारची दुर्गंधी येत नसे. मच्छी विक्री करणाऱ्या महिला जर का नियमाने मार्केटमध्ये बसून विक्री करू लागल्या तर, आत्ता मच्छी विक्री करण्यासाठी बसण्याच्या जागेवर नगर परिषदेला बाजारात येणाऱ्या नागरिकांसाठी पार्किंगची सुविधा उपलब्ध करता येईल.

जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले असून, त्या अनुषंगाने सदर मिळकतीचे अनुसूचीमध्ये नमूद केलेले विद्यमान मालक यांचे मालकी हक्क आम्ही तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून, ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस सदर मिळकतीसंदर्भात अथवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर, सदर मिळकतीतील कोणत्याही प्लॉटसंदर्भातील करार किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरूपाचा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, आपल्या हक्काच्या पुष्ट्यर्थ असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह, क्वाड्रा लीगल (Quadra Legal), वकील व सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत द्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास, सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्काची आहे असे गृहीत धरून आमचे अशील सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, तसेच संबंधितांनी आपला दावा, मागणी अथवा आक्षेप सोडून दिला आहे असे समजण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अनुसूची
(मिळकतीचे वर्णन)

नोंदणी जिल्हा रायगड व उप-जिल्हा कर्जत यांचे कार्यक्षेत्रातील, मौजे सावळे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथे स्थित असलेल्या खालील शेतजमिनी, तिजवरील सर्व हक्क, सुविधाधिकार, वहिवाट व अनुषंगिक लाभांसह :

अ.क्र.	मालकाचे नाव	सर्व्हे क्र./हिस्सा क्र.	क्षेत्रफळ	चतु:सीमा
१	(१) किरण रसिकलाल देसाई (२) स्वाती किरण देसाई (३) बिनिश किरण देसाई (४) निकिश किरण देसाई	९/३/अ/५ (खाते क्र. ६१६)	०.२१.७० (हे.आर.चौ.मी.)	पूर्वेस : हिस्सा क्र. ९/३/अ/९ पश्चिमेस : स.नं.९ चा लागू हिस्सा क्र.२ उत्तरेस : हिस्सा क्र. ९/३/अ/६ दक्षिणेस : हिस्सा क्र. ९/३/अ/४
२	कशिष जगदीश भोजवनी	९/३/अ/६ (खाते क्र. ७१५)	०.२१.१७ (हे.आर.चौ.मी.)	पूर्वेस : हिस्सा क्र.९/३/अ/९ व अंशतः ९/३/अ/८ पश्चिमेस : स.नं. ९ चा लागू हिस्सा क्र.२ उत्तरेस : हिस्सा क्र. ९/३/अ/७ दक्षिणेस : हिस्सा क्र. ९/३/अ/५
३	अमित मेहरअली मकाणी	९/३/अ/९ (खाते क्र. ६१७)	४१.१३ गुंठे	(संपूर्ण हिस्सा क्र. ९/३/अ/९ च्या सीमा) पूर्वेस : स.नं.९ चा लागू हिस्सा क्र.८ पश्चिमेस : हिस्सा क्र. ९/३/अ/१, ३, ४, ५ व अंशतः ६ उत्तरेस : हिस्सा क्र. ९/३/अ/८ दक्षिणेस : लागू स.नं. ८

* हिस्सा क्र. ९/३/अ/५ हा ७/१२ उताऱ्यावर आफरीन अमित मकाणी यांच्या नावे असून, वरील मालक क्र.(१) ते (४) यांनी त्यांचेकडून दि.१५/१०/२०२४ रोजीच्या, दुय्यम निबंधक कर्जत-२ येथे अ.क्र.६३२६/२०२४ अन्वये नोंदणीकृत खरेदीखताद्वारे खरेदी केला आहे. सदर खरेदीची फेरफार नोंद क्र. २२४९ दि. ३०/१०/२०२६ प्रमाणित होणे बाकी आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक :०५/११/२०२६
क्वाड्रा लीगल करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव
ई-मेल : vikrant.z@quadralegal.in

PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the public at large that our Client has agreed to purchase the property more particularly described in the Schedule hereunder written (the "Property"), and that we are investigating the title of its present owners named in the Schedule (the "Owners").

The Owners have represented to our Client that the Property is held by them with clear title and is in their actual possession, and that they have full right and authority to sell the same. All or any person having any right, title, interest, claim, demand and/or objection against, upon or in respect of the Property or any part thereof, by way of sale, exchange, lease, tenancy, license, trust, lien, maintenance, easement, inheritance, possession, attachment, mortgage, charge, gift, lis-pendens, FSI consumption, any agreement in respect of any plot comprised in the Property, or otherwise of any nature whatsoever, is hereby required to give written notice of the same, together with certified true copies of the documents in support thereof, to Quadra Legal, Advocates & Solicitors, 4th Floor, Jalaram Jyot, Janmabhoomi Marg, Fort, Mumbai 400 001, within 14 (Fourteen) days from the date of publication of this Notice.

If no claim or objection is received within the said period, our Client shall complete the purchase on the footing that the Owners have a clear and marketable title to the Property. Any claim or objection received thereafter shall not be considered, and the person concerned shall be deemed to have relinquished and waived the same.

THE SCHEDULE
(Description of the Property)

All those pieces and parcels of agricultural land situate, lying and being at Village Savale, Taluka Karjat, District Raigad, Maharashtra, within the Registration District of Raigad and Sub-District of Karjat, together with all rights, easements and appurtenances thereto, as under :

Sr. No.	Name of Owner	Survey No. / Hissa No.	Area	Boundaries
1	(1) Kiran Rasiklal Desai (2) Swati Kiran Desai (3) Binish Kiran Desai (4) Nikish Kiran Desai *	9/3/A/5 (Khata No.616)	0-21-70 (H.A.P.)	East: Hissa No. 9/3/A/9 West: Adjoining Hissa No. 2 of Survey No. 9 North: Hissa No. 9/3/A/6 South: Hissa No. 9/3/A/4
2	Kashish Jagdish Bhojwani	9/3/A/6 (Khata No. 715)	0-21-17 (H.A.P.)	East: Hissa No. 9/3/A/9 and in part 9/3/A/8 West: Adjoining Hissa No. 2 of Survey No. 9 North: Hissa No. 9/3/A/7 South: Hissa No. 9/3/A/5
3	Amit Meherali Makani	9/3/A/9 (Khata No. 617)	41.13 Gunthas	(Boundaries of the whole of Hissa No. 9/3/A/9) East: Adjoining Hissa No. 8 of Survey No. 9 West: Hissa Nos. 9/3/A/1, 3, 4, 5 and in part 6 North: Hissa No. 9/3/A/8 South: Adjoining Survey No. 8

* Hissa No. 9/3/A/5 stands in the name of Afreen Amit Makani on the 7/12 extract. Owner Nos. (1) to (4) above have purchased it from her under Sale Deed dated 15th October 2024 registered with the Sub-Registrar, Karjat-2 at Sr. No. 6326 of 2024. The mutation entry recording the purchase, M.E. No. 2249 dated 30th October 2026, is pending certification.

Mumbai,
Dated this 05th day of November 2026

For Quadra Legal
Sd/-
Vikrant Zunjarrao
Email: vikrant.z@quadralegal.in

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांना मौजे चोरढे, ता.मुरुड, जि.रायगड येथील खाली वर्णन केलेली मिळकत, त्यामधील बांधकामांसह विद्यमान मालक सर्फराझ कमाल काझी, जावेद कमाल काझी, तेहसीन कमाल काझी, फरझाना ईरफान रखांगी, फरहा कमाल काझी, मिसजा जावेद काझी, शकिला कमाल काझी यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे चोरढे, ता. मुरूड, जि. रायगड येथील

भुमापन व उपविभाग क्र.	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू.पैसे.
२७२	६२-७३-००	७४.०२

त्यामधील चोरढे ग्रामपंचायत घर क्र. ४८३ क्षेत्र १५०.२८ चौ.मी आणि घर क्र. ४८४ क्षेत्र २८०.३० चौ.मी.

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ५/११/२०२६

ॲड.रविंद्र विनायक ओक
''गुरुकृपा'' महर्षी कर्वे रोड,
मु.पो. ता.अलिबाग, जि.रायगड

अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण अलिबाग यांचे न्यायालयात कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याचे कलम ३२ ग अन्वये पोट-कलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस

नोटीस दावा क्रमांक ११/२०२६

१. श्री. पांडुरंग काशिनाथ पाटील
रा. मु. मुळे, पो. थळ, ता.अलिबाग, जि.रायगड
२. श्रीम. वत्सला सहदेव म्हात्रे उर्फ श्रीम. शारदा सहदेव म्हात्रे
पुर्वाश्रमीची वत्सला काशिनाथ पाटील
रा.मु.गणेश मंदिरामागे, मानी,
ता.अलिबाग, जि.रायगड — वादी/अर्जदार

विरुद्ध

श्रीम.जिजाबाई सदाशिव पोवार
रा. मु. मुळे, ता. अलिबाग, जि. रायगड — प्रतिवादी/ सामनेवाला

विषय- मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन नियम १९५६ चे कलम ३२ ग प्रमाणे

जमिनीचे वर्णन

गावाचे नाव	स.नं./ग.नं.	क्षेत्र हेक्टर आर	आकार रुपये पैसे
मौजे मुळे, ता.अलिबाग	१३२	०-०८-१० पो.ख. ०-००-७० **एकूण ०-०८-८०**	१.५१

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, वादी यांनी उपरोक्त नमुद मिळकतीची मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट नियम १९५६ चे कलम ३२ ग नुसार खरेदी किंमत ठरवून मिळणेकामी या न्यायालयात दि. २४/०६/२०२६ रोजी दावा/अर्ज दाखल केला आहे.

आता तुम्हास नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास तारिख २७/११/२०२६ रोजी ११-०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे शेतजमीन न्यायाधिकरणा पुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावीत आहे जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरुवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न रहिल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- ०४/११/२०२६

सही/-
(विक्रम पाटील)
अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण
अलिबाग- रायगड

जाहीर नोटीस

माझे आशिल श्री.प्रशांत विष्णु पाटील, मु. परहुर, पो.कामार्ले, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येते ती खालील प्रमाणे.

०१) मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड व ग्रामपंचायत धोकवडे हद्दीतील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत.

भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर.	आकार रू.पैसे
६३१	०.९२.७०	२१.५६

येणेप्रमाणे वर्णनाचे मिळकतीपैकी श्री. प्रमोद वसंत पाटील व सौ. रंजना अनिल पाटील यांचे हिश्श्याचे असलेले ०.२३.२२ हे.आर. या क्षेत्राचे मिळकती पैकी ०.०६.० हे.आर. हि मिळकत या नोटीशीचा विषय असून त्यास यापुढे ''सदरहू मिळकत'' म्हणून संबोधण्यात येत आहे.

०२) माझे आशिल यांनी श्री. प्रमोद वसंत पाटील व सौ. रंजना अनिल पाटील यांचे हिश्श्याचे असलेले ०.२३.२२ हे.आर. या क्षेत्राचे मिळकतीपैकी ०.०६.० हे. आर. इतके क्षेत्र श्री. प्रमोद वसंत पाटील, मु.तुडाळ, पो.नवगाव, ता. अलिबाग, जि.रायगड व सौ.रंजना अनिल पाटील, मु. मुळे, पो.थळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांजपासून खरेदी करण्याबाबत व्यवहार ठरविला आहे. या संदर्भात संबंधितांनी माझे आशिल यांचे लाभात दिनांक ११.०८.२०२६ रोजीचा साठेकरार लिहून दिला असून त्यांना मोबदला रक्कम सुद्धा अदा केली आहे. श्री. प्रमोद वसंत पाटील व सौ. रंजना अनिल पाटील यांनी सदर करारा प्रमाणे वागणुक न करता सदरहु मिळकतीमध्ये त्रयस्थांचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला आहे. श्री.प्रमोद वसंत पाटील व सौ. रंजना अनिल पाटील यांना माझे आशिल यांचा हक्क डावलुन सदरहु मिळकतीमध्ये त्रयस्थांचे हक्क निर्माण करण्याचा अधिकार नाही.

०३) तरी, या जाहीर नोटीशीने सर्व लोकांस कळविण्यात येते की, श्री. प्रमोद वसंत पाटील, मु. तुडाळ, पो.नवगाव, ता.अलिबाग, जि.रायगड व सौ. रंजना अनिल पाटील, मु.मुळे, पो.थळ, ता.अलिबाग, जि. रायगड यांचेशी मौजे धोकवडे भुमापन क्रमांक व उपविभाग ६३१ या मिळकती पैकी श्री प्रमोद वसंत पाटील व सौ. रंजना अनिल पाटील यांचे हिश्श्याचे असलेले ०.२३.२२ हे. आर. या क्षेत्राचे मिळकती बाबत किंवा सदरहु मिळकती बाबत कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्री व अन्य व्यवहार ठरवू नये. त्यास माझे आशिल यांची सक्त हरकत आहे, याची नोंद घ्यावी. कळावे.

अलिबाग
तारीख ०४.११.२०२६

(ॲड. एस.वाय.बारटके)
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे चेंढरे, श्रीबाग नं.३, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड नगरपरिषद अलिबाग हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक मे. मंदार इंटरप्रायझेस यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याविषयी ठरले असून लवकरच खरेदीखत रजिस्टर करण्यात येणार आहे. सदर मिळकत निर्वेध, बोजाविरहीत असल्याबद्दल खात्री करण्याकरीता ही नोटीस प्रसिद्ध केली आहे.

मिळकतींचे वर्णन

मौजे चेंढरे, श्रीबाग नं. ३, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड नगरपरिषद अलिबाग हद्दीतील सर्व्हे नं. १०३/१/अ, क्षेत्र ५०४ चौ. मी. या मिळकतीवरील हॉरीझोन प्रिमायसेस सहकारी संस्था मर्या. चेंढरे श्रीबाग नं. ३. या इमारती मधील तळ मजल्यावरील शॉप नं. ०५ क्षेत्र २१.०३ चौ. मी कारपेट

सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत मालकाने हवाला दिलेला आहे. तरी सदर वर वर्णन मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर कुणाचीही विक्री, गहान, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क व खरेदीखत या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरुपात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी.

याप्रमाणे मुदतीत कुणाचीही तक्रार हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध समजून मिळकतीच्या मालकाबरोबर रजिस्टर खरेदीखत पूर्ण केले जाईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०४/११/२०२६

सही/-
MP's Consultancy
श्री. मधुकर पाटील
१५. त्रिमुर्ती प्लाझा, ए बिल्डींग बीच रोड,
अलिबाग अर्बन बँक समोर, अलिबाग ४०२२०१

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३०००/- असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते
रितेश चं. घासे,
स्मरणार्थ, वायशेत,
अलिबाग

अजिंक्य मनोज पाटील,
अलिबाग

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे शेलु, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिनीच्या मिळकतीचे एकुण क्षेत्रापैकी खाते नं. १२८३ अन्वयेच्या ०.२०.०० हे.आर.चौ.मी क्षेत्रात्रे विद्यमान मालक व कब्जेदार पौर्णिमा देविदास नवलकेले यांचेकडुन आमचे अशिलांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे शेलु, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिनीची मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकारणी (रु.पै)
५७		०.५३.९० पो.ख. २.२४.९० एकुण २.७८.८०	५.८३

सदर मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी पौर्णिमा देविदास नवलकेले यांच्या मालकीच्या ०.२०.०० (हे.आर.चौ.मी.) क्षेत्राची मिळकत तदंगभुत सर्व हक्कहितसंबंधा सह कायम विकत घेणेचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकीत दान, बयाणा पावती, करार, साठेकरार, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडे

निवडक



कोलाड शाळेत किल्ले बनविण्याची स्पर्धा

कोलाड : पी. एम. श्री. राजिप केंद्र शाळा कोलाड येथे दिपावलीचे औचित्य साधून किल्ले बनविण्याचे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेत आपल्या कल्पकतेतून महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वैभवाचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांनी शिवनेरी, सिंधुदुर्ग, रायगड, राजगड, प्रतापगड, जंजिरा, तोरणा, सुवर्णदुर्ग, लोहगड, अशा अनेक ऐतिहासिक किल्ल्यांच्या सुंदर प्रतिकृती तयार केल्या.किल्ल्यांची रचना, तटबंदी, बुरुज आणि सजावट यामधून विद्यार्थ्यांची कल्पकता, कलाकौशल्य आणि ऐतिहासिक जाणीव दिसून आली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक लोहगड, द्वितीय क्रमांक सिंहगड, तृतीय क्रमांक रायगड जाहीर करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची ओळख झाली. दिपावलीच्या आनंदात ऐतिहासिक संस्कृतीचा जपवणूक करणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी व ज्ञानवर्धक ठरला.



कुडलीत सर्जनशील उपक्रमांची मेजवानी

सुतारवाडी : दिवाळीच्या सुट्ट्यांनिमित्त राजिप केंद्रशाळा कुडली येथे विद्यार्थ्यांसाठी विविध आनंददायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दिवाळी सुट्टीचा अभ्यास देतानाच कार्यानुभव व व्यावसायिक शिक्षणांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी आकर्षक आकाशकंदील, उटणे आणि सुंदर ग्रीटिंग काड्र्स तयार केली. तसेच चित्रकलेतून विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनाशक्तीला रंग भरले. स्वतः तयार केलेल्या वस्तू पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि आत्मविश्वास खुलला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळाली आणि स्वावलंबनाचा आनंद अनुभवता आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मोहन राठोड, शिक्षिका पूजा काळे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमामुळे शाळेत दिवाळीचा उत्साह अधिकच द्विगुणित झाला.



पनवेल बाजारपेठेत चिरोटे दाखल

खांदा कॉलनी : दीपावली सणाचे वेध लागले असून, ५ नोव्हेंबरपासून दीपावली उत्सवाला सुरुवात होणार आहे. दीपावलीतील अभ्यंगस्नानाला विशेष महत्त्व असून, ८ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या पहिल्या अभ्यंगस्नानासाठी पनवेलच्या बाजारपेठेत चिरोटे दाखल झाले आहेत. त्यामुळे फराळाच्या तयारीला वेग आला आहे. पहिल्या अभ्यंगस्नानाच्या दिवशी सकाळी स्नानानंतर गोडधोड खाण्याची परंपरा असल्याने चिरोट्यांना विशेष मागणी असते. घरगुती फराळासाठी वेळ नसलेले नागरिक बाजारातून तयार चिरोटे खरेदी करण्याला पसंती देत आहेत.



सकल मराठा मंडळाचा समाजाचा वर्धापन दिन साजरा

पनवेल : सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनी, पनवेल यांचा सहावा वर्धापन दिन खांदा कॉलनी येथील सेक्टर-९ मधील मराठा भवन येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात मंडळाचे सदस्य प्रदीप डावकर यांना मानाचा मराठा भूषण २०२६ पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच गुणवंत विद्यार्थी, त्यांचे पालक गणेश कडू यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थी-पालक गुणगौरव सोहळ्यात दहावी, बारावी आणि पदवी परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष संतोष जाधव यांनी आपल्या मनोगतात मंडळाच्या समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. या सोहळ्यास मंडळाचे कार्यकारी मंडळ, सर्व सदस्य, समाजबांधव आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्नेहभोजनाने या वर्धापन दिन सोहळ्याची उत्साहात सांगता झाली.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy in Office Education- Bsc/ Bcom, Salary - 15000 Per month, Location - Bamansure, Contacat- 9823585321
- Vacancy in Furniture Showroom Education- Bsc/Bcom, Experience -2 Years, Salary - 20,000 Per month, Location - Zirad, Contacat- 9823585321
- दुकानगाळा भाड्याने देणे आहे. विक्री करणे आहे. २० गुंठे जागा अलिबागपासून २ किमीवर ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

वरदविनायक मंदिराच्या जीर्णोद्धाराला प्रारंभ

|| पारंपरिक स्थापत्यशैलीत दगड-चुन्याचा वापर, वर्षभरात काम पूर्ण करण्याचे नियोजन

। खोपोली । प्रतिनिधी ।

अष्टविनायकांपैकी एक आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या महड येथील वरदविनायक मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कामाला अखेर प्रारंभ झाला आहे. मंदिराचे प्राचीन वैभव, ऐतिहासिक वारसा आणि पारंपरिक स्थापत्यशैली जपत तब्बल १२ कोटी रुपयांच्या निधीतून मंदिराचा भव्य पुनर्विकास करण्यात येणार आहे. शनिवारी (दि. ३१)ऑक्टोबर रोजी देवस्थान विश्वस्त कमिटीच्या कार्याध्यक्षा मोहिनी वैद्य तसेच गावातील महिला आणि ग्रामस्थांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला.

महडच्या वरदविनायकाच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह देशाच्या



विविध भागांतून हजारो भाविक येत असतात. नवसाला पावणारा गणपती आणि भक्तांच्या श्रद्धेचे अधिष्ठान म्हणून वरदविनायकाची ओळख आहे. त्यामुळे मंदिराचा जीर्णोद्धार हा केवळ वास्तूचा कायापालट नसून अनेक पिढ्यांपासून जपल्या गेलेल्या धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

या पुनर्विकासासाठी १२ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली काम करण्यात येत आहे. मंदिराचे ऐतिहासिक स्वरूप कायम राखण्यासाठी बांधकामात पारंपरिक पद्धतीने दगड आणि चुन्याचा वापर केला जाणार आहे.

मंदिराचा मुख्य ऐतिहासिक गाभारा कायम ठेवून बाहेरील जुन्या बांधकामाचा आवश्यक भाग हटविण्याचे काम सुरू

> **कामाच्या कालावधीत भाविकांना कोणतीही गैरसोय किंवा अडचण जाणवल्यास त्यांनी देवस्थान विश्वस्त कमिटी किंवा उपस्थित कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा. भाविकांच्या सुरक्षिततेसह दर्शनाच्या सोयीसाठी देवस्थान कमिटी सदैव सहकार्य करेल,**
> **-मोहिनी वैद्य**
> **कार्याध्यक्षा**

करण्यात आले आहे. संपूर्ण जीर्णोद्धारासाठी अंदाजे एक वर्षाचा कालावधी अपेक्षित आहे.

भूमिपूजनप्रसंगी कार्याध्यक्षा मोहिनी वैद्य यांनी भाविक आणि ग्रामस्थांना सहकार्याचे आवाहन केले. मंदिराचे जुने बांधकाम हटविण्याचे काम सुरू असल्याने दर्शनासाठी येणारे भाविक, स्थानिक ग्रामस्थ, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना कोणताही धोका निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित ठेकेदाराला आवश्यक ठिकाणी बॅरिकेडिंग करण्यासह शासनाच्या सूचनांचे फलक लावण्याच्या सूचना दिल्याचे त्यांनी सांगितले.

महडच्या पवित्र भूमीत सुरू झालेला हा जीर्णोद्धार म्हणजे केवळ दगड-मातीच्या बांधकामाचा प्रवास नाही, तर श्रद्धा आणि भक्तीपरंपरेचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प आहे. श्रद्धा तीच, आस्था तीच; मात्र वरदविनायकाचे मंदिर आता नव्या वैभवात भाविकांच्या सेवेत उभे राहणार आहे.

यावेळी प्रसाद पाटील, नरेंद्र पाटील, जयेश पाटील, अविनाश पाटील, मंदार जोशी, साहिल पाटील यांच्यासह देवस्थान कमिटीचे सदस्य, महिला आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

दर्शनाची परंपरा राहणार कायम

जीर्णोद्धाराच्या काळातही भाविकांना श्रींच्या दर्शनापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी देवस्थान विश्वस्त कमिटीने पर्यायी व्यवस्था केली आहे. त्यानुसार कलश स्थापना करण्यात आली असून दर्शनाची परंपरा सुरू राहणार आहे. मंदिराचे बांधकाम सुरू असताना भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात येत आहे.

बांधण रस्त्यावर कुत्र्यांची दहशत

। पेझारी । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील पोयनाड- नागोठणे रस्त्यावर बांधण ते श्रीगाव या रस्त्यावर सकाळी मॉर्निंग करणाऱ्या अनेक ग्रामस्थांना उनाड कुत्र्यांमुळे भीतीचे वातावरण पसरले आहे.

रस्त्यावर अंदाजे ३२ ते ३५ कुत्री सतत वावर करत असल्यामुळे या रस्त्यावर मॉर्निंग वॉक करणे धोक्याचे ठरत आहे. काही दिवसांपूर्वीच आंबेपूर पेझारी मान्यवर ग्रुपचे सदस्य सुनील काकडे यांच्यावर याच कुत्र्यांनी जीवघेणा हल्ला केला होता.



एवढे होऊनही आजपर्यंत पंचायतीने कुठल्याही प्रकारची मोहीम राबवली नाही.

त्यामुळे कुत्र्यांचे कळप सतत या परिसरामध्ये वावरत करत आहेत. तसेच याच रस्त्याने नाना पाटील हायस्कूला जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्यामुळे या विद्यार्थ्यांना कुत्र्यांच्या दहशती खाली जावे लागत आहे.

प्रिया पाटील मिस हेरिटेज इंडियामध्ये चमकली

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाराष्ट्राचा ऐतिहासिक व समृद्ध सांस्कृतिक वारसा जपणारा आणि सौंदर्य व कौशल्याचा संगम असलेला 'मिस व मिसेस हेरिटेज इंडिया २०२६' (सीझन-५) हा राज्यस्तरीय फॅशन शो नुकताच पुण्यात दिमाखात पार पडला. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत अलिबाग, वरसोली (विजयनगर) येथील प्रिया विजय पाटील हिने आपल्या अप्रतिम सादरीकरणाच्या जोरावर 'मिस हेरिटेज इंडिया २०२६' चे द्वितीय उपविजेतेपद पटकावून अलिबाग तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्याचे नाव उज्ज्वल



केले आहे.

महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग प्रस्तुत आणि 'मृणाल एंटरटेनमेंट' आयोजित हा भव्य फॅशन शो (दि.३०) ऑक्टोबर रोजी बंटारा भवन, बाणेर (पुणे) येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मृणाल गायकवाड यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या अनोख्या फॅशन शोमध्ये संपूर्ण भारतातून निवडक २० स्पर्धक अंतिम फेरीत दाखल झाले होते.

पारंपरिक वेशभूषा, महाराष्ट्राची संस्कृती, बुद्धिमत्ता आणि व्यक्तीमत्त्वाच्या विविध फेऱ्यांमधून प्रियाने परीक्षकांची मने जिंकली. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेत तिने 'सेकंड रनर-अप'चा बहुमान संपादन केला. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून तिचे अभिनंदन होत असून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

घोटगावमध्ये गुटखा जप्त

। पनवेल । प्रतिनिधी ।

तळोजा पोलिसांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकासह घोटगाव परिसरात छापा टाकून ६ लाख ६८ हजार १५२ रुपये किमतीचा प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. तळोजा घोटगाव येथे घरामध्ये प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याचा मोठ्या प्रमाणात साठा करून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार अन्न व औषध प्रशासन विभागाचे सचिन आढाव आणि त्यांच्या पथकाने संशयित घरावर छापा टाकून माल जप्त केला.

सागमळा येथील वयोवृध्द बेपत्ता

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील चौल परिसरातील सागमळा येथील ७२ वर्षीय वयोवृध्द बेपत्ता झाले आहेत. शनिवारी (दि.३१) रात्री घरातून ते बाहेर गेले. मात्र, त्यांचा अद्याप तपास लागला नाही. त्यांचे नातेवाईक गेल्या दोन दिवसापासून त्यांचा शोध घेत आहे.



याप्रकरणी हरविल्याची तक्रार रेवदंडा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कोणाला सापडल्यास संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांसह त्यांच्या नातेवाईकांकडून करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काशीनाथ बाळू घरत (७२ वर्षे) असे या वयोवृध्द बेपत्ता व्यक्तीचे नाव आहे. ते चौल परिसरातील राम मंदिर जवळील सागमळा येथे राहणारे आहेत.

घरत हे अंगाने सडपातळ असून रंग गोरा आहे. चेहरा उभट, छातीवर डाव्या बाजूला दोन तीळ, अंगात पांढऱ्या राखाडी रंगाचा, उभी लाईन असलेला शर्ट, निळ्या रंगाची फुल पॅन्ट, पायात निळ्या रंगाची चप्पल, गळ्यात लाल रंगाचा दोरा असे वर्णन आहे. कोणाला सापडल्यास रेवदंडा पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

गुरुपाद स्वामींचा भंडारा उत्साहात

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील खारेपाट विभागातील श्रीमद् गुरुपाद मूर्ती समाधीस्थळ नारंगी भुवनेश्वर येथे स्वामींचा भंडारा भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी स्वामींचा अभिषेक, श्रीराम प्रासादिक भजन मंडळ नारंगी यांचे भजन, देहेन येथील हरिपाठ, महाआरती आणि त्यानंतर महाप्रसाद झाल्यानंतर भंडाऱ्याची सांगता झाली. भंडाऱ्याचा कार्यक्रमाचे आयोजन नरेश बाळकृष्ण म्हात्रे, सेवेकरी व अध्यक्ष संतोष वेळे यांच्या मार्गदर्शनाखाली भंडारा संपन्न झाला.

डॉ. मोहम्मद शेख यांना पदोन्नती

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील डॉ. मोहम्मद आमिर शेख यांची पिल्लई एचओसी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुखपदी (एचओडी) पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या यशामुळे उरण परिसरासह शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

डॉ. शेख यांनी या पदोन्नतीबद्दल महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. वासुदेवन पिल्लई, प्राचार्य डॉ. जगदीश डब्लू. बाकल सर आणि फ्रनव पिल्लई यांचे आभार मानले. विभागप्रमुख म्हणून नवीन जबाबदारी स्वीकारताना विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण



देणे, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आधुनिक बदलांशी त्यांना अवगत करणे तसेच संशोधन, नवोपक्रम आणि शैक्षणिक प्रगतीला चालना देण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार डॉ. शेख यांनी व्यक्त केला. त्यांना या पदोन्नती मिळाल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदन करुन पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

टूथब्रश बाहेर काढण्यात यश

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

दात घासताना चुकून टूथब्रश गिळल्याने ५० वर्षीय व्यक्तीला रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली. तपासणीत संपूर्ण टूथब्रश पोटात अडकल्याचे स्पष्ट झाल्यानंतर मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी एंडोस्कोपीद्वारे कोणतीही शस्त्रक्रिया न करता तो बाहेर काढला. या उपचारानंतर काही तासांतच रुग्णाला घरी सोडण्यात आले. पेण येथील राहणारे राजेंद्र माळुसरे हे सकाळी दात घासत असताना चुकून त्यांच्या तोंडातून टूथब्रश पोटात गेला. सुरुवातीला त्यांनी स्थानिक डॉक्टरांकडे धाव घेतली. त्यामुळे पुढील तपासणीसाठी त्यांना नवी



मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले. येथे एन्डोस्कोपी करुन टूथब्रश त्यांच्या पोटात अडकल्याचे दिसून आले. मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉ. रावसाहेब राठोड यांच्या नेतृत्वाखालील टिमने ही आव्हानात्मक प्रक्रिया यशस्वी पार पाडली.

अन्नत्याग आंदोलनाची सांगता

। माणगाव । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा तसेच इतर मागण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातर्फे पक्षाचे खा. सुप्रिया सुळे, आ. रोहित पवार, शशिकांत शिंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली व रवींद्र चव्हाण, सज्जाद डावरे यांच्या नेतृत्वाखाली माणगाव तहसील कार्यालयासमोर (दि.२८) ऑक्टोबरपासून अन्नत्याग आंदोलन सुरु केले होते. (दि.१) नोव्हेंबर रोजी पालकमंत्री भरत गोगावले, मंत्री आदिती तटकरे यांनी भेट देत जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित केला जाईल असे सांगण्यात आले आणि आंदोलनकर्त्यांनी आंदोलनाची सांगता केली.

ज्येष्ठ नागरिक संघ कुर्डुसतर्फे गुणवंतांचा सन्मान

। कुर्डुस । प्रतिनिधी ।

ज्येष्ठ नागरिक संघ कुर्डुस विभागाच्या वतीने गुणवंत तरुणांचा सन्मान सोहळा आणि संस्थेची सर्वसाधारण सभा ऑक्टोबरमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या सोहळ्यात परिसरातील गुणवंत विद्यार्थी, तरुण, शेतकरी-कामगार, प्रतिष्ठित नागरिक आणि महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. संस्थेचे अध्यक्ष सुभाष म्हात्रे यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. सनदी



लेखापाल परीक्षेत आर्या पाटील, दहीहंडी फोडण्यात विशेष प्रावीण्य मिळविणारे हर्ष पिंगळे, तसेच दहावी व बारावी परीक्षेत ग्रामीण भागातून उल्लेखनीय यश मिळविणारा सार्थक गोळे सार्थक पाटील यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी चंद्रकांत थळे, सहायक आयुक्त यांनी संस्थेला शुभेच्छा देत भविष्यातील वाटचालीसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. सुधाकर पिंगळे यांनीही संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे आयोजन सुभाष म्हात्रे, यशवंत पाटील, जनार्दन पाटील, रघुनाथ पाटील, अशोक पाटील आदीने विशेष मेहनत घेतली.

आकाशात झेपावणाऱ्या फटाक्यांच्या विक्रीवर निर्बंधाची मागणी | **प्रकाशामुळे दिशाभानावर परिणाम होण्याची शक्यता**

फटाक्यांमुळे विमान सुरक्षतेचा प्रश्न ऐरणीवर

। पनवेल । प्रतिनिधी ।

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर आणि परिसरात फटाक्यांच्या दुकानांची संख्या वाढत असताना नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या हवाई सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विमानतळाच्या जवळील परिसरात आकाशात उंच झेपावणारे रॉकेट, मल्टिशॉट, मिसाईलसदृश फटाके आणि मोठ्या उंचीवर फुटणाऱ्या फटाक्यांच्या विक्री व वापरावर निर्बंध आणण्याची मागणी नागरिक, सामाजिक संस्था आणि



पर्यावरणप्रेमींकडून होत आहे.

विमानतळाच्या आगमन व प्रस्थान मार्गाजवळ अशा प्रकारचे फटाके उडविल्यास विमानांच्या उड्डाण आणि उतरणीच्या वेळी संभाव्य धोका निर्माण होऊ शकतो का, याचे तांत्रिक मूल्यांकन करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे. विमानांच्या सुरक्षित उड्डाणासाठी वैमानिकांना आवश्यक असलेली दृश्य स्पष्टता आणि दिशाभान अबाधित राहणे महत्त्वाचे असल्याने या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची मागणी होत आहे.

यापूर्वी गणेशोत्सव काळातही पनवेल पोलिसांनी नवी मुंबई विमानतळाच्या हवाई सुरक्षेचा विचार करून लेझर लाईट आणि लेझर शो टाळण्याचा सल्ला आयोजकांना दिला होता.

विक्रीस्थळांची नियमांनुसार तपासणीची मागणी

पनवेलमधील फटाक्यांच्या दुकानांना परवाने देताना विमानतळाच्या हवाई मार्गांचा विचार केला जातो का, उंच आकाशात जाणाऱ्या फटाक्यांमुळे विमानांच्या उड्डाण आणि उतरणीच्या प्रक्रियेत संभाव्य अडथळा निर्माण होऊ शकतो का, तसेच फटाक्यांची साठवणूक आणि विक्रीस्थळांची नियमांनुसार तपासणी होते का, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

विमानांच्या उड्डाण व उतरणीच्या वेळी तीव्र लेझर प्रकाशामुळे वैमानिकांच्या दृश्य दिशाभानावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी दक्षता घेण्याचे आवाहन केले होते. आता दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आकाशात उंच जाणाऱ्या फटाक्यांचा मुद्दाही चर्चेत आला आहे. प्रशासनाने वेळीच ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पनवेलकरांकडून होत आहे.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

जाहीर नोटीसीस प्रत्युत्तर

(दिनांक २८ ऑक्टोबर, २०२६ दैनिक कृषीवल पान क्रमांक ७
ॲड.रश्मी आर.शिंदे, अलिबाग यांचे मार्फतची
जाहीर नोटीस)

तमाम लोकांनी, जनतेला, रहिवासी लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, मौजे आगरसुरे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीत या नोटीसचा विषय आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नंबर	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
आगरसुरे, ता.अलिबाग जि.रायगड	३३७/१	२-१९-२९ ०-३१-३० ०-२४-०० २-७५-२९	२६.८७

वरील वर्णनाच्या मिळकती या केवळ निखिल मधुसूदन शहा यांचे ७/१२ दप्तरी व महसुल खात्याकडे नोंदलेले आहे. वरील वर्णनाची मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, वहिवाट, वापर, उपभोग सन १९८८ पासून माझे पक्षकार सुबोध पुरूषोत्तम राऊत यांचेकडे सलगरित्या अव्याहतपणे आहे. माझे पक्षकार सुबोध पुरूषोत्तम राऊत यांचे प्रत्यक्ष ताबा, वहिवाट, वापर, उपभोग, याला मागील ३८ वर्षे निखिल मधुसूदन शहा व त्यांचे पुर्वगामी मधुसूदन जयाभाई शहा यांनी केव्हाही, कोठेही, कधीही अडथळा अथवा हरकत घेतलेली नव्हती.

२) माझे पक्षकार सुबोध पुरूषोत्तम राऊत यांचा वरील वर्णनाच्या मिळकतीत प्रत्यक्ष ताबा, सलगरित्या मागील ३८ वर्षे आहे. त्यामुळे वरील वर्णनाच्या मिळकती संदर्भात कोणीही व्यक्ती, इसम, संस्था यांनी खरेदी विक्री व्यवहार अथवा अन्य स्वरूपाचे व्यवहार करू नयेत. याकरीता सदरची नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे. आमचे अशिलांचा प्रत्यक्ष ताबा वरील मिळकतीमध्ये आहे. वरील मिळकतीचे टायटल क्लिअर नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

३) तरी माझे अशिलांच्या ताब्यात त्रयस्थ इसमांनी हरकत करू नये व जागेचे स्वरूप बदलण्याचा प्रयत्न करू नये. याकरीता ही नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे. तसेच आमचे अशिलांच्या ताब्यास कोणीही व्यक्ती अथवा जनतेने हरकत घेतल्यास तसेच मिळकतींचे स्वरूप बदलण्याचा प्रयत्न केल्यास आमचे अशिल संबंधित व्यक्तींविरूद्ध चोख दिवाणी व फौजदारी कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

४) तसेच माझे अशिलांचे सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास सक्त हरकत असताना निखिल मधुसूदन शहा आणि मधुसूदन जयाभाई शहा, रा.आगरसुरे, ता.अलिबाग जि.रायगड यांनी केलेला व्यवहार हा बेकायदेशीर राहणार आहे. तसेच निखिल मधुसूदन शहा आणि मधुसूदन जयाभाई शहा यांना माझे अशिलांच्या ताबे, कब्जा, वहिवाटीची मिळकत माझे अशिलांचे अपरोक्ष विक्री करण्याचा कायदेशीर अधिकार नाही याची नोंद घ्यावी.

५) तसेच निखिल मधुसूदन शहा व मधुसूदन जयाभाई शहा यांनी केलेला सदरचा विक्री अथवा खरेदी व्यवहार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर खरेदी व्यवहारातील खरेदीदार हे प्रामाणिक खरेदीदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

६) तरी, तमाम जनतेस कळविण्यांत येते की, सदर वर नमुद मिळकती विकत घेण्यास माझे अशिलांची सक्त हरकत आहे. तसेच माझे अशिलांचे वर नमुद केलेल्या मिळकतीत असणारे ताबा, वापर, वहिवाट बाबत असणारे हक्क तमाम जनतेला माहिती व्हावेत याकरीता ही नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

तसेच वरील मिळकती संदर्भात कुणाही व्यक्तीने खरेदी अथवा विक्री व्यवहार करू नये. तसेच खरेदीदारांना सावध करावे या हेतूने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

अलिबाग
दिनांक : ५/११/२०२६

सही/-
ॲड.अजय उपाध्ये
श्रीनिल सोसायटी, ब्राम्हण आळी,
अलिबाग रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. चंद्रशेखर यशवंत वागळे, रा.अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे मालकीची व खुद्द ताबेकब्जा वहिवाटीची मौजे राजेवाडी, ता. अलिबाग, सर्व्हे नं. ३, क्षेत्र १-६९-५ हे. आर आकार २६.९४ रु. पैसे व सर्व्हे नं. ४, क्षेत्र ०-३२-१ हे. आर, आकार ५-१२ रु. पैसे सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांनी दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर यांचे न्यायालयात रे. मु. नं. २२६/२०१३ चा दावा दाखल केला असून महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण मुंबई यांचे कोर्टात दोन अपिले दाखल केलेली आहेत. अशाप्रकारे सदर मिळकतीचा वाद न्यायालयामध्ये प्रलंबित आहे.

सदर मिळकतीबाबत जगदिश साबाजी दळवी रा. मालाडे, रामराज, ता. अलिबाग हे त्रयस्थ इसमांचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याच्या तयारीत आहेत. तरी सदर मिळकतीबाबत कोणीही कसलाही व्यवहार वरील न्यायालयीन वाद लक्षात घेवून जगदिश साबाजी दळवी यांचे बरोबर करु नये असा कोणताही व्यवहार कोणीही केल्यास तो सदर मिळकतीचा प्रामाणिक खरेदीदार होणार नाही त्यास मालमत्ता हस्तांतरण कायदा कलम ५२ ची बाधा आहे. सदर व्यक्ती विरुद्ध आमचे अशिल कायदेशीर कारवाई करतील.

हे कळावे.

अलिबाग,
दि. ०४-११-२०२६.

ॲड. आर.बी.कोसमकर
चिरायु, ब्राम्हण आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

आमचे अशिल एन. के. प्रॉपर्टीज तर्फे भागीदार श्री. किरण परुळेकर रा. मुलुंड, मुंबई यांनी दिलेल्या माहिती वरुन व सांगितले वरुन त्यांचे तर्फे जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात खालीलप्रमाणे.

मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड व ग्रामपंचायत झिराड हद्दीतील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत आहे.

मौजे	गट क्र.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर	आकार रु.पैसे
झिराड, अलिबाग	७	१	०-१६-५०	०२.४०
	१५		०-१२-४०	००.३०
	१६		०-१३-००	००.२०

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत व सदरहू मिळकतीत असलेले ग्रामपंचायत क्र. ४१६ ते ४२२, ७१०, ७१८ व ९१० अशी मिळकत या नोटीशीचा विषय असून त्यास यापुढे सदरहू मिळकत म्हणून संबोधण्यात येत आहे.

एन. के. प्रॉपर्टीज तर्फे भागीदार श्री. किरण माधव परुळेकर वगैरे यांनी श्री. महेंद्र वसंत फडके वगैरे यांचे विरुद्ध करारांची विशेष पुर्तता करुन मिळणेकरीता अलिबाग दिवाणी न्यायालयात स्पेशल मुकदमा क्र.१३६/२०१४ चे प्रकरण दाखल केले असून ते प्रकरण देखील प्रलंबित आहे. स्पेशल मुकदमा क्र.१३६/२०१४ चे कामी मा. दिवाणी न्यायालयाने श्री. महेंद्र वसंत फडके वगैरे यांनी सदरहू मिळकतीमध्ये त्रयस्थांचे हक्क हितसंबंध निर्माण करु नये, असा तुर्तातूर्त ताकिदीचा आदेश केला आहे. असे असताना श्री. महेंद्र वसंत फडके यांनी मा. न्यायालयाचे आदेशाचा भंग करुन व आमचे अशिल यांचा हक्क डावलून मौजे झिराड गट क्र. ७/१, क्षेत्र ०-१६-५० हे. आर आकार २.४० रु. पैसे, गट क्र. १५, क्षेत्र ०-१२-४० हे. आर, आकार ००.३० रु.पैसे, गट क्र. १६, क्षेत्र ०-१३-०० हे. आर, आकार ००.२० रु. पैसे आणि ग्रामपंचायत क्र. ४१६ ते ४२२, ७१०, ७१८ व ९१० ही मिळकत ॲड. अनंत देवजी पाटील, मु. कन्या शाळेजवळ, अलिबाग, पो. ता. अलिबाग, जि. रायगड यांना बेकायदेशीर खरेदीखता अन्वये खरेदी दिली आहे. ॲड. अनंत देवजी पाटील यांना वरील न्यायालयीन आदेशाची व प्रकरणाची माहिती होती.

तरी या जाहीर नोटीशीने सर्व लोकांस कळविण्यात येते की, ॲड. अनंत देवजी पाटील, मु. कन्या शाळेजवळ, अलिबाग, पो.ता.अलिबाग, जि.रायगड यांना वर नमूद मिळकतीबाबत कोणतेही हक्क व अधिकार प्राप्त झालेले नाहीत. अथवा कब्जा मिळालेला नाही याची नोंद घ्यावी तसेच ॲड. अनंत देवजी पाटील यांचेशी वर नमूद मिळकती बाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार ठरवू नये त्यास आमचे अशिल यांची सक्त हरकत आहे याची नोंद घ्यावी.

कळावे,

अलिबाग,
दि. ०४-११-२०२६.

ॲड. आर.बी.कोसमकर
चिरायु ब्राम्हण आळी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे गुढवण, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिनीची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार १. कै. नामा जैतु खंडवी मयत तर्फे वारस - श्री. धमु नामा खंडवी, २. कै. बाळु धर्मा खंडवी मयत तर्फे वारस - पालु बालु खंडवी मयत तर्फे वारस - श्री. गणपत पालु खंडवी, ३. कै. कृष्णा भिवा पारधी मयत तर्फे वारस - कै. मल्हार कृष्णा पारधी मयत तर्फे वारस - श्रीम. मनिषा मल्हार पारधी, श्री. गणेश मल्हार पारधी ४. कै. कान्हु भिवा पारधी मयत तर्फे वारस - कै. मल्हार कृष्णा पारधी मयत तर्फे वारस - श्रीम. मनिषा मल्हार पारधी, श्री. गणेश मल्हार पारधी यांचेकडुन आमचे अशिलांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे गुढवण, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिनीची मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकारणी (रु.पै)
२९	४/अ	०.७७.०० पो.ख. ०.२८.०० एकुण १.०५.००	०.००

तदंगभूत सर्व हक्कहितसंबंधा सह कायम विकत घेणे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकीत दान, साठेकरार, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपट्टा, जाणे येणेचे मार्ग, वारसाहक्क वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहित असल्याचे आमचे अशिल समजतील. तसेच कोणाचीही हरकत असल्यास ती त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिली आहे असे समजुन आमचे अशिल विक्री व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पत्ता :''श्रीसद्गुरु कृपा'', १४४अ,
मु.पो.शेलु, ता.कर्जत, जि.रायगड.
मोबा. नं. ९८६०६२६२४६

ॲड. संदिप गोपाळ बागडे
खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील नमुद मिळकतीचे मालक श्री. अरविंद महादेव बैकर यांचेकडुन खरेदी घेण्याविषयी ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन :-
मौजे बिडवागळे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत,

गट नंबर	क्षेत्र आर.चौ.मी.	आकार रू. पै.	पो.ख.
३१३	०.२८.१०	८.१०	०.०२.४०

तरी ही वर वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, मालकी, दान, लिज, पोटगी, चार्ज, बक्षीस, ताबा, जाण्या येण्याचा हक्क, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, गहाण, फरोक्त, संपादन, भाडेपट्टा, साठेकरार, कुळहक्क अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झालेपासुन चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपली लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास कुणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तो आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मागावून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ३१/१०/२०२६

सही/-
ॲड. गौरव नित्यनाथ पवार
कार्या. घर नं.५१६, एम्प्लॉयमेंट ऑफिसजवळ,
भंडार आळी, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९१६८१६५७६२

प्रो.जमा नि.नं. नि ७६/ड

अपिलार्थीतर्फे वकील -
श्री.सुरेंद्र नारायण जोशी,

जाहीर नोटीस
अलिबाग येथील मे. प्रमुख जिल्हा न्यायाधिश, रायगड यांचे न्यायालयात.

दिवाणी अपील नं. ९९१/२०१०.

श्री. नारायण शिवराम पाटील वगैरे, ..अपिलार्थी.

विरूद्ध

श्रीमती प्रमिला विठ्ठल म्हात्रे वगैरे, ...उत्तरार्थी.

प्रति,

२/१) श्री. गजानन बुधाजी ठाकूर,
मु. रूम नं. ७२९, गोळफादेवी रोड,
वरळी कोळीवाडा, मुंबई ४०००३०.
२/२) श्री. मारूती बुधाजी ठाकूर,
मु. रूम नं. २२८, गोळफादेवी रोड,
वरळी कोळीवाडा, मुंबई ४०००३०.
२/३) सौ. मंदा नरेश पाटील,
मु. चरी, पो. पोयनाड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
२/४) सौ. कुंदा मुकुंद बैकर,
रा.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड.
२/५) सौ. सविता विजय घरत,
रा.मांडवा (दस्तुरी पाडा), ता.अलिबाग, जि.रायगड.

ज्याअर्थी, अपिलार्थीनी या न्यायालयात, अलिबाग येथील दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयातील रे.मु.नं.३७/२००२ मधील हुकूमनाम्याविरूद्ध अपिल दाखल केलेले आहे व सदर अपिलात तुम्हांस उत्तरार्थी नं.२ चे वारस/प्रतिनिधी म्हणून पक्षकार केले आहे.

आणि ज्याअर्थी, तुम्हास या न्यायालयाने सदर अपिलाचे कामी समन्स/नोटीस काढले असता सदर पत्यावर राहात नाही असा शेरा मारून न बजावता परत आलेली आहे व त्याची बजावणी होऊ शकलेली नाही. त्यामुळे सदर समन्स/नोटीसची बजावणी जाहीर नोटीशीद्वारे करण्याचा आदेश मा. न्यायालयाने केला आहे. त्याअर्थी, तुम्हांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, या अपिलाचे कामी आपण नेमल्या तारखेस म्हणजे दिनांक ०९.१२.२०२६ रोजी या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सकाळी ११.०० वाजता हजर राहून आपले म्हणणे पुराव्यासह दाखल करावे. सदर नेमल्या तारखेस आपण या न्यायालयात गैरहजर राहिल्यास तुमचेविरूद्ध सदर अपिलाचे कामी एकतर्फी सुनावणी करण्यात येईल.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस मा.न्यायालयाचे आदेशाने, न्यायालयाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

अलिबाग,
तारीख : ०२.१०.२०२६

सही/-
क.लिपीक,
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग

सही/-
अधिक्षक
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की.

मौजे-चाणजे, ता.उरण, जि.रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी मा. तहसीलदार, उरण यांचे न्यायालयात दावा क्र.५६/२०२६ हा दाखल केला होता. सदरहू दाव्यात आमचे विरुद्ध आदेश पारित झालेले आहेत. आम्ही सदरहू आदेशाविरुद्ध मा. उपविभागीय अधिकारी, पनवेल विभाग, पनवेल यांचे न्यायालयात अपिल दाखल करीत आहोत. सदरहू मिळकतीमध्ये आमचा कायदेशीर हक्क, हितसंबंध व अविभाजित हिस्सा आहे.

मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नं./ हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे.आर.	आकार रु.पैसे
३९/९	०-३९-९० पोट खराबा ०-०३-६० एकूण ०-४३-५०	९=९५

तरी उपरोक्त नमूद मिळकतीबद्दल श्री.जगदीश मुकुंद थळी व इतर -३ यांचेबरोबर कुणीही खरेदी-विक्रीचा सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, फरोक्तखत, खरेदीखत, विकसन करार, विकसनापूर्वीचा सामंजस्य करार, विकसनाचे कुलमुखत्यारपत्र अथवा इतर कोणतेही दस्तऐवज निष्पादित करु नयेत, नोंदणीकृत करु नयेत, त्यांना अंशतः अथवा पूर्ण मोबदला रक्कम अदा करु नये.

वर नमूद केल्याप्रमाणे वर्तणूक न करता कुणीही श्री.जगदीश मुकुंद थळी व इतर- ३ यांचेबरोबर खरेदी-विक्रीचा, हस्तांतरणाचा, तबदिलीचा अथवा अन्य कोणताही व्यवहार केल्यास व त्याअनुषंगाने दस्तऐवज निष्पादित केल्यास, त्या तथाकथित व्यवहारांस व त्याअनुषंगाने झालेल्या दस्तऐवजांस लिस पेंडन्सचे कायदेशीर तत्वाची सक्त बाध राहिल. सदरहू व्यवहार व त्या अनुषंगाने झालेले कथित दस्तऐवज बेकायदेशीर, व्यर्थ व निरर्थक ठरतील व ते कायद्याने आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत. तसेच कथित व्यवहार व त्या अनुषंगाने झालेले कथित दस्तऐवज रद्द होवून मिळण्याकरिता आम्हाला सर्व संबंधितांचे विरुद्ध दिवाणी न्यायालयात योग्य ती कायदेशीर कारवाई दाखल करावी लागेल व सदरहू मिळकतीमधील आमचे कायदेशीर हक्क डावलून, आमची फसवणूक करुन कथित व्यवहार व दस्तऐवज केल्याबद्दल सर्व संबंधितांविरुद्ध पोलीसांत फसवणूकीचा गुन्हा दाखल करावा लागेल. सदरहू न्यायालयीन दाव्याचे व फौजदारी कारवाई कामी होणारा सर्व न्यायालयीन खर्च व कागदपत्र, वकील फी इत्यादी खर्च संबंधितांवर राहिल. कृपया याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

ठिकाण:- उरण
दिनांक:- ०५/११/२०२६.

सही
श्रीमती शोभा हरेश्वर म्हात्रे व इतर-२
रा. घर नं.१०५०, सातघर करंजा,
ता.उरण, जि.रायगड.
नोटीस देणार

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे धामणी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत.

स.नं./हि.नं.	क्षेत्र (हे.आर. पॉ.)	आकार (रू.पै.)	भोगवटाधारकाचे नाव
१६३/३	१.९४.०० पो.ख.०.४५.००	१.१०	श्री.अभिजीत शत्रुघ्न शिंगोले, वैगेरे.
	एकुण २.३९.००		

यापैकी लिहून देणार श्री. अभिजीत शत्रुघ्न शिंगोले यांच्या नावे असलेल्या ०.७९.०० हे.आर.पॉ. क्षेत्रापैकी ०.३९.०० हे.आर.पॉ व श्री.सुयोग सुर्यकांत वेटे यांच्या नावे असलेले ०.७९.०० हे.आर.पॉ. क्षेत्र

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०५/११/२०२६.

सही /-
ॲड. उषा जे. कांबळे
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो.नं.७३८५००४८०६

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी व जिल्हा रायगड, जिल्हा निबंधक रायगड, दुय्यम निबंधक अलिबाग, पोट तुकडी व तालुका अलिबाग, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती अलिबागमधील ग्रुपग्रामपंचायत कामालेंचे हद्दीतील मौजे लोणघर गट नं. ३७ (जुना कामालें गट नं. २१७), क्षेत्र ० हे. २ आर, आकार ० रूपये ०५ पैसे, मौजे लोणघर गट नं. ३८/२, (जुना कामालें गट नं. १८८/२), क्षेत्र ० हे. २९ आर, आकार ६ रूपये २३ पैसे व मौजे लोणघर गट नं. ४१, (जुना कामालें गट नं. २२१) क्षेत्र ० हे. ९७.४० आर, आकार १४ रूपये ६२ पैसे या वर्णनाच्या यापुढे ''सदर मिळकती'' म्हणून संबोधण्यात आलेल्या मिळकतींच्या मालक व भोगवटादार वसंत रामा कडवे व अर्चना वसंत कडवे यांनी ''सदर मिळकती'' संदर्भातील खाली दिलेल्या अनुसूचित नमूद केलेल्या यादीतील मुळ दस्तऐवज हे एकतर हरवले आहेत किंवा गहाळ झालेले आहेत व त्यांचा शोध लागत नाही, असे प्रतिपादन आमचेकडे केलेले आहे. सदर मिळकतीचे मालक म्हणून वसंत रामा कडवे व अर्चना वसंत कडवे यांनी अशी खात्री दिली आहे की, त्यापैकी कोणतेही मुळ दस्तऐवज कोणत्याही व्यक्तीकडे/व्यक्तींकडे किंवा आस्थापनेकडे ''सदर मिळकती'' कर्जापोटी जामीन ठेवण्याच्या उद्देशाने जमा केलेले नाहीत.

ज्या कुणा व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा सदर मिळकतींमध्ये अथवा त्यातील कोणत्याही भागावर वाडवडिलार्जित वारसाहक्क, गहाण, विक्री, बक्षिस, दान, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, बेचनपत्र (असाईनमेंट), कुळ हक्क, भाडेकरूपणाचा हक्क, अदलाबदल, मृत्यूपत्राद्वारे हक्क, वारसाहक्क, लिएन, बोजा, विश्वस्त, पोटगी, अन्न-वस्त्राचा हक्क, इजमेंट (सुविधाधिकार), व्यवस्थापन, जप्ती, परवानाधारक, तारण, कर्ज, हातउसनवारी, न्यायालयाचा हुकूमनामा अथवा आदेश, कंत्राट, करारपत्र या अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असेल आणि/किंवा अशा हक्कांमुळे किंवा अन्य कारणास्तव सदर मिळकतीसंदर्भातील मुळ दस्तऐवज त्यांचे ताब्यात असतील तर त्यांनी सदरची बाब या नोटीसीच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसात ज्या दस्तऐवजांच्या आधारे ते असा हक्क सांगू इच्छित आहेत त्या संबंधीत मुळ दस्तऐवजांच्या प्रतींसह खाली नमूद केलेल्या आमच्या पत्यावर लेखी कळवावे, मुदतीत कुणाकडूनही तसे कळविण्यात न आल्यास कुणाच्याही ताब्यात सदरचे मुळ दस्तऐवज नाहीत व कुणाचाही, कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे, असे गृहित धरण्यात येईल.

अनुसूची
(मुळ दस्तऐवजाची यादी)

१) देऊबाई एकनाथ पाटील व इंदूबाई मनोहर पाटील हे खरेदी देणार व वसंत रामा कडवे हे खरेदी घेणार यांचेमध्ये स्वाक्षरीत झालेले दिनांक ११/७/२००६ रोजीचे व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र. २००७/२००६ कडे नोंदविण्यात आलेले खरेदीखत.

२) श्री. बबन गोविंद पाटील हे खरेदीखत लिहून देणार व श्री. वसंत रामा कडवे वगैरे २ हे खरेदीखत लिहून घेणार यांचेमध्ये स्वाक्षरीत झालेले दिनांक ३१/५/२०१२ रोजीचे व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र. २०३१/२०१२ कडे नोंदविण्यात आलेले खरेदीखत.

३) पुष्कर मंदार बापट, शारदा सुहास भुस्कुटे, माधवी चंद्रकांत राईलकर व जयश्री मंदार बापट हे खरेदीखत लिहून देणार व श्री. वसंत रामा कडवे वगैरे २ हे खरेदीखत लिहून घेणार यांचेमध्ये स्वाक्षरीत झालेले दिनांक १८/६/१९९२ रोजीचे व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र.१२६२/१९९२ कडे नोंदविण्यात आलेले खरेदीखत.

अलिबाग
तारीख : ०५/११/२०२६

सही/-
ॲड.गणेश गोविंद पाटील
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

मौजे - बाणें, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्वे नं.	हिस्सा नं.	आकार रू. पै.
१. अमोल अरुण लाड २. अरुण बळीराम लाड	५	क्षेत्र.आर.पॉ. ०-३३-१० पो.ख ०-०३-३० एकुण ०-३६-४० गुंठे क्षेत्र मिळकत	१-३१

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०४/११/२०२६

अधिवक्ता
शैलेश दत्तात्रेय पवार
पत्ता.घर क्र.३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु. कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड,
मो. ९५९५२११८६७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांना मौजे भिसराई, ता.अलिबाग जि.रायगड येथील खाली वर्णन केलेल्या मिळकती खालील नमुद त्यांचे विद्यमान मालक यांचेकडुन खरेदी घेण्याचा करार केला आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे भिसराई, ता. अलिबाग, जि. रायगड येथील

विद्यमान मालकांची नावे	भुमापन व उपविभाग क्रमांक	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकारणी रू.पैसे.
रश्मी चंद्रकांत पाटील, स्नेहा संदीप ठाकूर, पिरोज संतोष पाटील, मंगेश दत्ताराम पाटील	७६	००-२३-३०	१.३७
मंगेश दत्ताराम पाटील	१२२	००-४३-५०	६.९४

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ०४/११/२०२६

**

निवडक

तिलक वर्माकडे संघाचे कर्णधापद

मुंबई : बीसीसीआयच्या निवड समितीने आशियाई क्रिकेट परिषद पुरुष रायझिंग स्टार आशिया कप २०२६ साठी भारत अ संघाची घोषणा केली आहे. ही आगामी स्पर्धा यावर्षी १९ ते २९ नोव्हेंबर दरम्यान कतारमधील दोहा येथे होणार आहे. ही स्पर्धा देशातील अनेक युवा खेळाडूंना आपली प्रतिभा दाखवण्याची एक महत्त्वपूर्ण संधी देईल. या स्पर्धेसाठी बीसीसीआयने युवा आणि अनुभवी फलंदाज तिलक वर्माला भारताचे कर्णधारपद सोपवले आले आहे. तर, रजत पाटीदारला उपकर्णधार म्हणून घोषित केले आहे. इंडिया अ च्या फलंदाजी विभागात अनुभव आणि युवा खेळाडूंचा समावेश आहे. या संघात १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीचा समावेश आहे. वैभवने अलीकडेच आपल्या स्फोटक फलंदाजीने लक्ष वेधून घेतले आहे. परंतु, न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत वैभवला केवळ दोन सामन्यांमध्ये खेळण्याची संधी मिळाली. संघाच्या आघाडीच्या फळीत अभिषेक शर्मा आणि वैभव सूर्यवंशी यांच्यासारखे स्फोटक फलंदाज आहेत. आपल्या आक्रमक फलंदाजीने सुरुवातीच्या षटकांमध्येच प्रतिस्पर्धी संघावर दबाव टाकण्याची क्षमता या दोघांमध्ये आहे. दरम्यान, मधली फळी मजबूत करण्यासाठी प्रभसिमरन सिंग, कुमार कुशाग्र आणि रिंकू सिंग यांसारख्या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. सूर्यांश शेडगेचाही संघात समावेश आहे. विशेषतः रिंकू सिंगकडून शेवटच्या षटकांमध्ये जलद धावा करून संघाला कठीण परिस्थितीत एक मोठी धावसंख्या उभारण्यास मदत करण्याची अपेक्षा असेल.

सामना सुरू होण्याआधीच संघ निलंबित

नवी दिल्ली : अरुणाचल प्रदेशनंतर आता मेघालय क्रिकेट संघही क्रिकेट बोर्डातील अंतर्गत वादाचा बळी ठरला आहे. नागालँडविरुद्धच्या रणजी ट्रॉफी प्लेट ग्रुप सामन्याच्या अवघ्या एक दिवस आधी संपूर्ण संघाला निलंबित करून त्यांच्या जागी नवीन संघ आणण्यात आल्याचे वृत्त आहे. मेघालय क्रिकेट असोसिएशनच्या सर्वोच्च परिषदेने पहिल्या तीन रणजी ट्रॉफी सामन्यांसाठी संघाची निवड केली. लैंगिक छळाच्या तक्रारी दडपल्याचा आरोप असलेले असोसिएशनचे सचिव रेनॉल्ड खरकमानी यांच्या निलंबनावरून सर्वोच्च परिषद आणि मंडळाचे अध्यक्ष जेम्स संगमा यांच्यात वाद निर्माण झाला होता. अंतर्गत कलहामुळे संघाला निलंबित करून त्याच्या जागी नवीन संघ आणण्यात आला. खेळाडूंनी सराव केला होता. सामनाधिकाऱ्यांसोबत एका बैठकीलाही हजेरी लावली होती. पण संध्याकाळपर्यंत त्यांना कळले की, ते आता राज्य संघटनेचा अधिकृत संघ राहिलेले नाहीत. फलंदाज राहुल दलाल म्हणाला, आम्ही सर्वजण सरावासाठी गेलो होतो आणि सामनाधिकाऱ्यांनी आम्हाला सांगितले, काळजी करू नका. तुम्ही खेळाल कारण बीसीसीआयने तुम्हाला स्वीकारले आहे. संध्याकाळी आम्हाला सामनाधिकाऱ्यांचा फोन आला की, आम्हाला आता खेळण्याची परवानगी नाही. हा संपूर्ण वाद मेघालय क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आणि सर्वोच्च परिषद यांच्यातील आहे.

प्रसिद्ध कृष्णा फिट घोषित

नवी दिल्ली : भारतीय वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाला आयसीसीच्या सेंटर ऑफ एक्सलन्सने फिट घोषित केले आहे. बंगळुरूमध्ये १ आणि २ नोव्हेंबर रोजी झालेल्या मॅच सिम्युलेशन टेस्टमध्ये यशस्वी ठरल्यानंतर वैद्यकीय पथकाने त्याला मैदानावर पुनरागमनाची मंजुरी दिली. आता तो कसोटी, वनडे आणि टी-२० या तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळण्यासाठी फिट आहे. मात्र, फिट होऊनही प्रसिद्ध न्यूझीलंडविरुद्ध ४ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या पाच सामन्यांच्या वनडे मालिकेत खेळणार नाही. तो लवकरच न्यूझीलंडला रवाना होऊ शकतो, जिथे ७ नोव्हेंबरपासून इंडिया- आणि न्यूझीलंड- यांच्यात होणाऱ्या तिसऱ्या आणि अखेरच्या अनधिकृत कसोटी सामन्यात खेळण्याचा प्रयत्न करेल.प्रसिद्धला ३० सप्टेंबर रोजी वेस्ट इंडिजविरुद्ध गुवाहाटी येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या वनडे सामन्यादरम्यान दुखापत झाली होती. त्याने सामन्यात केवळ ५ षटके गोलंदाजी केली आणि त्यानंतर मैदान सोडावे लागले. तपासणीत त्याच्या हॅमस्ट्रिंगला दुखापत झाल्याचे समोर आले होते.सामना सिम्युलेशनमध्ये खेळाडूला खऱ्या सामन्यासारख्या परिस्थितीत सराव करवून घेतला जातो. गोलंदाजाच्या बाबतीत तो किती वेगाने धावू शकत आहे, पूर्ण ताकदीने गोलंदाजी करू शकत आहे की नाही आणि सलग षटके टाकल्यानंतर शरीराची प्रतिक्रिया कशी असते, हे पाहिले जाते.प्रसिद्धला न्यूझीलंडविरुद्धच्या पाच एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठीच्या सुरुवातीच्या संघात स्थान मिळाले होते, मात्र त्यांचे खेळणे फिटनेस मंजुरीवर अवलंबून होते.



समरजीत, अनिका दोन गटांत विजेते

पुणे : समरजीत इंगळे आणि अनिका मुसळे यांनी महाराष्ट्र राज्य शॉटगन नेमबाजी स्पर्धेतील ट्रॅप प्रकारात दोन गटांत विजेतेपद जिंकण्यात यश मिळवले. यशवंत शिंदे आणि राजकुंवर इंगळे यांनी बालेवाडी-म्हाळुंगे येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलातील शॉटगन शूटिंग रेंजवरील स्पर्धेत पुरुष आणि महिला गटात बाजी मारली. मास्टर्स प्रकारात शूटऑफ जिंकत रविंदरसिंह धामी यांनी सोनेरी यश मिळवले. समरजीत आणि अनिका यांनी युवा आणि ज्युनियर गटांत विजेतेपद मिळवले. समरजीत युवा गटात प्रतिस्पर्ध्यांपेक्षा वीसहून अधिक गुणांनी सरस ठरला. ज्युनियर गटात त्याने किमान दहा गुणांच्या फरकाने वर्चस्व राखले. अनिकाला दोन्ही गटांत स्मिता सावंतचे आव्हान होते. अनिकाने स्मितापेक्षा नऊ गुण जास्त मिळवले. यशवंत शिंदेने अखेरच्या फेऱ्यांत कामगिरी उंचावत अभिषेक पाटीलला तीन गुणांनी मागे टाकत पुरुषांची स्पर्धा जिंकली. राजकुंवर इंगळेने महिलांच्या स्पर्धेत घेतलेली आघाडी अखेरपर्यंत कायम राखली. पाच फेऱ्यांच्या या ट्रॅप स्पर्धेत चांगलीच चुरस झाली. त्यातही मास्टर्स गटातील तीनही पदके शूटऑफद्वारे निश्चित झाली. सर्व प्राथमिक फेऱ्यांनंतर भूषण मुसळे आणि रविंदरसिंह धामी यांचे समान १०२ गुण होते. निर्णायक शूटऑफमध्ये रविंदर २-१ असे सरस ठरले.

भारताची विजयी सलामी

शुभमन-विराटची शतकी भागीदारी; न्यूझीलंडचा ४ वर्षांनी हिशोब चुकता

। ईडन पार्क । वृत्तसंस्था ।

पावसामुळे प्रभावित झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडवर डीएलसनुसार ५ विकेट्सने विजय मिळवला आहे. भारताने न्यूझीलंडला ४०.२ ओव्हरमध्ये १८५ रन्सवर गुंडाळलं होतं. त्यामुळे भारताला १८६ धावांचं आव्हान मिळालं. मात्र दुसऱ्या डावात पावसाने अनेकदा खोडा घातल्याने खेळ थांबवावा लागला. त्यामुळे भारताला डीएलएसनुसार ३२ ओव्हरमध्ये १४३ धावांचं सुधारित आव्हान मिळालं. भारताने हे आव्हान ५ विकेट्सच्या मोबदल्यात २२.४ ओव्हरमध्ये पूर्ण केलं. भारताने मालिकेत विजयी सलामी दिली.

भारताच्या या विजयात विराट कोहली आणि कर्णधार शुभमन गिल या दोघांनी प्रमुख भूमिका बजावली. त्यामुळे भारताला हे आव्हान सहज पूर्ण करता आलं.



विराट आणि शुभमन या जोडीला नाबाद परतून भारताला विजयी करण्याची संधी होती. मात्र नॅथन स्मिथ याने शुभमन गिल याला आऊट करत ही जोडी फोडली. शुभमनने ५६ बॉलमध्ये ३७ धावा केल्या. शुभमनने या खेळीत ५ चौकार लगावले. शुभमन आणि विराट या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी १०४ बॉलमध्ये ११३ रन्सची पार्टनरशीप केली. शुभमननंतर विराट कोहलीही आऊट झाला. जेकब डफी याने विराटला टीम सायफर्ट याच्या हाती कॅच आऊट केलं. विराटने ५१ बॉलमध्ये ७४ रन्स केल्या. विराटने या खेळीत १३ चौकार आणि १ षटकार लगावला. विराटनंतर मैदानात आलेल्या अक्षर पटेल याने निराशा केली. अक्षर झिरोवर आऊट झाला. श्रेयस अय्यर याने १५ धावा करुन मैदानाबाहेरचा रस्ता धरला. त्यानंतर केएल राहुल आणि नमन धीर या दोघांनी उर्वरित धावा करुन भारताला विजयी केलं.

त्याआधी कर्णधार श्रेयस अय्यर याने टॉस जिंकून न्यूझीलंडला बॅटिंगसाठी भाग पाडलं. मात्र भारतीय गोलंदाजांसमोर न्यूझीलंडला संपूर्ण ५० ओव्हर खेळता आलं नाही. भारताने न्यूझीलंडला ४०.२ ओव्हरमध्ये १८५ रन्सवर ऑलआऊट केलं. भारताने न्यूझीलंडला ३५.१ ओव्हरमध्ये १४६ धावांवर नववा झटका दिला. त्यामुळे न्यूझीलंडच्या १५० धावा होणंही अवघड वाटत होतं. मात्र ११ व्या स्थानी आलेल्या ब्लेअर टीकनर याने न्यूझीलंडची लाज राखली. ब्लेअर आणि जेकब डफी या दोघांनी १० व्या विकेटसाठी ३१ बॉलमध्ये ३९ रन्सची पार्टनरशीप केली. त्यामुळे न्यूझीलंडला १८५ रन्सपर्यंत पोहचता आलं. ब्लेअरने २३ बॉलमध्ये ४ सिक्स आणि १ फोरसह ३४ रन्स केल्या. टीम सायफर्ट याने ३८, ग्लेन फिलीप्स याने ३० तर डॅरेल मिचेलने २८ धावांचं योगदान दिलं. भारताकडून अर्शदीप सिंह याने सर्वाधिक ४ विकेट्स मिळवल्या. गुरनूर ब्रार याने तिघांना आऊट केलं. तर अंशुल कंबोज याने २ विकेट्स मिळवल्या. तर रोहित शर्मा याने कडक थ्रोच्या मदतीने ग्लेन फिलीप्स याला रन आऊट केलं.

पराभवाची परतफेड

भारताने न्यूझीलंडचा ४ वर्षांआधीचा जुना हिशोब चुकता केला आहे. नोव्हेंबर २०२२ साली झालेल्या सामन्यात भारतावर मात केली होती. या मैदानात ३०० पेक्षा अधिक धावा करुनही पराभूत व्हावं लागलं होतं. त्यामुळे भारताने न्यूझीलंडचा पराभवाचा हिशोबा चुकता करण्याची संधी दवडली नाही.

रोहित शर्मा डक

भारताची विजयी धावांचा पाठलाग करताना निराशाजनक सुरुवात राहिली. न्यूझीलंडने भारताला पहिल्याच ओव्हरमध्ये झटका दिला. कायल जेमीसन याने पहिल्या ओव्हरमधील सहाव्या अर्थात शेवटच्या बॉलवर रोहित शर्मा याला मिचेल सँटनर याच्या हाती कॅच आऊट केलं. रोहितला भोपळाही फोडता आला नाही.

नेमबाज तेजस कुसळेचे स्कीट स्पर्धेत विजेतेपद

। पुणे । प्रतिनिधी

कोल्हापूरच्या तेजस कुसळेने महाराष्ट्र राज्य शॉटगन नेमबाजी स्पर्धेच्या सांगता दिनी पुरुषांच्या स्कीट स्पर्धेत विजेतेपद जिंकले. बुधवारी या स्पर्धेची सांगता झाली. ट्रॅप स्पर्धेतील नेमबाजांचे यश तेजसने स्कीटमध्ये कायम राखले.



बालेवाडी-म्हाळुंगे येथील श्री शिवछत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलातील शॉटगन शूटिंग रेंजवर ही स्पर्धा झाली. त्यातील तेजसने प्रभावी कामगिरी करताना ९७ गुणांसह बाजी मारली. त्याने कोल्हापूरच्याच उल्हास सहस्त्रबुद्धे याचेच आव्हान तेजसला होते. उल्हास ४९ गुणच नोंदवू शकले. या स्पर्धेबरोबरच पुरुष विभागातील मास्टर्सचीही स्पर्धा झाली. त्यात उल्हास आणि विवेक तिवारी यांचा सहभाग होता. उल्हासने ४९ तसेच विवेकने ३९ गुण मिळवले. दोघांनी किमान पात्रता गुण न मिळवल्यामुळे या गटात कोणालाही विजेतेपद देण्यात आले नाही. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा महाराष्ट्र राज्य नेमबाजी संघटनेचे अध्यक्ष अशोक पंडित तसेच सचिव शीला कानुंगो यांच्या हस्ते झाला.

बेंचप्रेस स्पर्धेत खेळाडूंनी वेधले लक्ष

। पनवेल । प्रतिनिधी ।

व्ही. के. हायस्कूल पनवेल येथे कै. कु. दीपक अरुण पाटकर स्मरणार्थ समस्त पाटकर कुटुंबीयांच्या सौजन्याने क्लासिक व इक्वीपड बेन प्रेस स्पर्धा संपन्न झाली.

यास्पर्धेतपुरुषवमहिलागटाच्या सब ज्युनिअर, ज्युनियर, सीनियर, मास्टर्स आणि गतिमंद अशा ७० खेळाडूंनी भाग घेतला होता. या स्पर्धेच्या बक्षीस समारंभाला पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक सुनील झुंजारराव हे अगत्याने आले होते.

याप्रसंगी त्यांचा सन्मान असोसिएशनने यशवंत मोकल संदीप पाटकर सुभाष टेंबे यांनी केला. नगरसेवक सुनील झुंजारराव यांच्या हस्ते पहिल्या राष्ट्रीय डेड लिफ्ट मास्टर स्पर्धेचे कांस्यपदक



मिळवून देणारे ज्येष्ठ खेळाडू माधव गोविंद पंडित यांना आणि आणि नोव्हेंबर २०२६ मध्ये तुर्कीय येथे होणारे आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल ठाणे जिल्ह्याच्या प्रतिभा लोणे यांना खास सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेच्या बक्षीस समारंभ प्रसंगी शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित पॉवरलिफ्टिंग खेळाडू संजय रहाटे आणि मुंबई शहरचे माजी सचिव विनायक आचरेकर हे विशेष अतिथी म्हणून आले. या स्पर्धेतील खेळाडूंना माधव पंडित, सचिन भालेराव, यशवंत मोकल, गोपीनाथ पवार, सुरेश धुळप, रामचंद्र गावडे, सुभाष टेंबे, संदीप पाटकर, अरुण पाटकर, विनायक आचरेकर, संजय रहाटे, जितेंद्र यादव, विशाल मुळ्ये, दिनेश पवार इत्यादींच्या हस्ते पदक प्रदान करण्यात आली.

या स्पर्धेचे क्लासिक सांघिक विजेतेपद स्पार्टन्स फिटनेस खोपोली आणि उपविजेतेपद हनुमान व्यायामशाळा पेण यांनी प्राप्त केले. इक्विप्ड स्पर्धेचे ओव्हरऑल विजेतेपद आयएनडी क्लब कर्जत आणि उपविजेतेपद पावर हाऊस पॉवरलिफ्टिंग टीम खोपोली यांनी प्राप्त केले.

या विजेत्यांना कै. दीपक सुरेखा अरुण पाटकर स्मरणार्थ चषक देण्यात आले. सब ज्यूनियर स्ट्राँग बॉय क्लासिक स्पर्धा रौनक रोशन जितेकर, क्लासिक सीनियर स्ट्राँगमॅन तन्मय मोहन पाटील, क्लासिक मास्टर्स स्ट्राँग मॅन दिनेश हरिचंद्र पवार आणि ओव्हर ऑल स्ट्राँग वुमनअमृता भगत हे खेळाडू विजेते ठरले.

ठाणे जिल्हा कबड्डी संघटनेची किशोर /किशोरी निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

एकता संघाचे सलग दोन विजय



। ठाणे । प्रतिनिधी ।

ठाणे जिल्हा कबड्डी असो. च्या किशोर गट निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत एकता संघाने साखळीत सलग दोन विजय मिळवीत बाद फेरीतील आपला प्रवेश निश्चित केला. संघर्षला मात्र समिश्र यश मिळाले. ठाणे जिल्ह्याने रा. फ. नाईक स्पोर्टस् व ग्रीफिन्स जिम. यांच्या संयुक्त सहकार्याने कोपरखैरणे येथील रा. फ. नाईक शाळेच्या पटांगणावर या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

आज पहिल्या दिवशी झालेल्या अ गटात काल्हेरच्या एकता संघाने प्रथम खारेगावच्या जय बजरंगचा ४५-२७ असा, तर नंतर डॉन बॉस्कोचा ५१-२७ असा पाडाव करीत बाद फेरी गाठली. युग तरेच्या झंझावाती खेळाने एकताला हे विजय सोपे गेले. त्याला दीप म्हात्रेची उत्तम साथ लाभली. जय बजरंग कडून यज्ञ पाटील, तर डॉन बॉस्को कडून वेदान्त तांबे यांनी बरी लढत दिली.

फ गटात संघर्ष मंडळाला समिश्र यश मिळाले. प्रथम त्यांनी ज्ञानविकास मंडळाला पराभूत केले. रोहन जाधव, प्रिन्स यांच्या चौफेर खेळाने हे शक्य झाले. ज्ञानविकासाच्या स्वराज वाबळे यांनी उत्तरार्धात कडवी लढत दिली. पण दुसऱ्या सामन्यात श्री स्वामी समर्थ मंडळाने संघर्षवर मात करीत धक्का दिला. विश्रांतीला २५-१८ अशी आघाडी संघर्ष मंडळाकडे होती. पण ती त्यांना राखता आली नाही. विश्रांती नंतर श्री स्वामी समर्थच्या जयदेव नवघरे, ऋषिकेश शेळके यांनी आपला खेळ गतिमान करीत संघाला विजयी केले. विराज वैजागे, रोहन जाधव यांना आपल्या खेळात सातत्य राखता न आल्याने ते पराभूत झाले. श्री साई शिवाई संघाने शिवाई कबड्डी संघाला नमवीत क गटात पहिल्या विजयाची नोंद केली. रोहन गाडे, प्रसाद भोसले यांच्या चतुरस्त्र खेळाला याचे श्रेय जाते. बाळ गोपाळ मंडळाने ब गटात श्री विठ्ठल मंडळावर विजय मिळविला. यशराज सिंग विजयी, तर निखिल पराभूत संघाकडून उत्कृष्ट खेळले. ओम् वर्तकनगरने शिवसाई मंडळाला चकवित बाद फेरीतील आपली जागा निश्चित केली. ऋषभ यादव, राहुल शिगवण यांच्या संयमी खेळाला या विजयाचे श्रेय जाते. शिवसाईच्या आर्यन मौर्या, वेदांत पवार यांनी कडवी लढत दिली.

पाकिस्तानी खेळाडूच्या कानाखाली जाळ

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

बॉक्सिंगमध्ये भारत आणि पाकिस्तान आमने सामने येणार आहेत. मात्र या सामन्याआधी दुबईत राडा झाला आहे. भारतीय बॉक्सर आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर असलेल्या मनीष शर्माने पाकिस्तानी प्रतिस्पर्धी रहीम परदेसी याला स्टेजवरच कानशिलात मारली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मनीष शर्माला हाफइंजिनिअर यानावाने ओळखलं जातं. दुबईमध्ये फ्युरी बाय द सी मुका बॉक्सिंग या कार्यक्रमाच्या प्रमोशनसाठी दोन्ही बॉक्सर एकत्र आले होते. यावेळी त्यांच्यात फेस-ऑफ झाला. सामन्याआधी दोन्ही खेळाडू एकमेकांसमोर उभे राहून आमनेसामने आले. तेव्हा रहीम परदेसी याने मनीष शर्माला बोलून आणि काही हातवारे करून डिवचण्याचा प्रयत्न केला. यातून वाद वाढला आणि मनीष शर्माचा राग अनावर झाला. मनिष शर्माने स्टेजवरच रहीम परदेसीच्या कानशिलात लगावली.मनीषने कानशिलात मारताच कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित असलेल्यांना धक्का बसला.

रत्नागिरीच्या मैदानावर अदिती पानवलकरचा ठसा

। कापोली । प्रतिनिधी ।

खेळाडूच्या अंगी असलेली जिद्द, मेहनत आणि संघासाठी सर्वस्व पणाला लावण्याची वृत्ती जेव्हा मैदानावर उतरते, तेव्हा यश निश्चितच मिळते. याचाच प्रत्यय रत्नागिरी येथे पार पडलेल्या मुंबई विद्यापीठ आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत आला आहे.

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या ए. सी. एस. कॉलेज, श्रीवर्धनची गुणवान खेळाडू अदिती पानवलकर हिने कोकण विभागाच्या संघाचे प्रतिनिधित्व करत आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर रौप्य पदकाची ऐतिहासिक कमाई केली आहे.

अदितीने संपूर्ण स्पर्धेत आपल्या खेळातील चपळाई, अचूकता, आक्रमकता आणि आत्मविश्वासाच्या जोरावर अत्यंत प्रभावी कामगिरी केली. तिच्या या दैदिप्यमान यशामुळे गोखले कॉलेज श्रीवर्धनच्या क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे.तिच्या संपूर्ण प्रवासात मार्गदर्शनाचा मोलाचा वाटा ठरला.

या यशस्वी कामगिरीसाठी



■ मुंबई विद्यापीठ आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत कोकण विभागाला रौप्य पदक

अदितीला प्रशिक्षक निकेत कोसबे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच संघ व्यवस्थापक अमोल खेराडे, महाविद्यालयाचे क्रीडा प्रमुख डॉ. विशाल माने आणि डॉ. सागर कुंभार यांचेही विशेष सहकार्य लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य विवेक खरे आणि उपप्राचार्य डॉ. राजू गोरुले यांनी अदितीला वेळोवेळी प्रोत्साहन व मार्गदर्शन देऊन तिचे मनोबल वाढवले.तिच्या या देदिप्यमान कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा | शम्स, आकाश यांची अर्धशतके

रेल्वे संघाला मुंबईने ढकलले बॅकफूटवर

। मुंबई । प्रतिनिधी ।

रणजी करंडक स्पर्धेतील ड-गटातील सामन्याच्या दुसऱ्या दिवशी मुंबईने अखेरच्या सत्रात दोन महत्त्वपूर्ण बळी मिळवत रेल्वे संघाला बॅकफूटवर ढकलले. दिवसअखेर रेल्वेने पहिल्या डावात २ बाद ११६ धावा केल्या असून ते अद्याप मुंबईच्या पहिल्या डावातील धावसंख्येपेक्षा २८० धावांनी पिछाडीवर आहेत. तत्पूर्वी, मंगळवारी पहिल्या सत्रात शम्स मुलाणी आणि आकाश आनंद यांनी अर्धशतके साकारून मुंबईला ३९६ धावांपर्यंत मजल मारून दिली.



ब्रेबॉर्न स्टेडियमवर सुरू असलेल्या या सामन्यात मुंबईच्या तनुष कोटियन आणि शम्स मुलाणी यांनी प्रत्येकी एक बळी मिळवत संघाला महत्त्वाचे यश मिळवून दिले. खेळपट्टी संथ असून काही वेळा चेंडूच्या उसळीत अनिश्चितता दिसत आहे. याचाच फायदा मुंबईच्या गोलंदाजांनी घेतला. रेल्वेकडून सलामीवीर विवेक सिंहने ५० चेंडूंत आठ चौकारांसह नाबाद ३८ धावा केल्या. मात्र, मोहित अवस्थीच्या आखूड टप्प्याच्या चेंडूवर बचाव करण्याचा प्रयत्न करताना चेंडू पाठीवर आदळल्याने त्याला दुखापत झाली आणि मैदान सोडावे लागले. नवीन चेंडूचा अपेक्षित फायदा न मिळाल्याने मुंबईच्या गोलंदाजांना वेगवेगळ्या रणनीतींचा वापर करावा लागला. मात्र, रेल्वेच्या फलंदाजांनी सुरुवातीची २५ षटके संयमाने खेळून काढली.

२६व्या षटकात तनुष कोटियनने साहब सिंहला यष्टिरक्षकाकडे झेल देण्यास भाग पाडत मुंबईला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर शम्स मुलाणीने इशान गोयलला पुढे येऊन खेळण्यास प्रवृत्त केले. मात्र, त्याचा फटका फसल्याने अतिरिक्त कव्हरवर उभ्या असलेल्या सिद्धेश लाडने सोपा झेल टिपला. दिवसाचा खेळ थांबला तेव्हा कर्णधार भार्गव मेराई ७ आणि मोहम्मद सैफ २९ धावांवर नाबाद होते.

दिवसाच्या सुरुवातीला मुंबईने पहिल्या डावातील धावसंख्या वाढवण्यावर भर दिला. पहिल्या दिवसअखेर दुसऱ्या आणि तिसऱ्या सत्रात प्रत्येकी तीन गडी गमावल्यामुळे मुंबईची अवस्था ६ बाद २४७ अशी झाली होती. दुसऱ्या दिवशी उर्वरित चार फलंदाजांनी आणखी १४९ धावांची भर घातली. यात शम्स मुलाणीचे योगदान सर्वाधिक महत्त्वाचे ठरले. डावखुऱ्या मुलाणीने १५३ चेंडूंत सात चौकारांसह ७१ धावांची संयमी खेळी केली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)